- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर    संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २४० | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# एससी-एसटी आरक्षणात क्रीमी लेयर लागू नाही !

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून स्पष्ट केले आहे की, अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) च्या आरक्षणात क्रीमी लेयरचे तत्त्व लागू होत नाही. सरकारने या प्रकरणी त्या जनहित याचिकांना विरोध केला आहे, ज्यात एससी-एसटी आरक्षणात क्रीमी लेयर लागू करण्याची आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षणासाठी अधिक न्यायसंगत धोरण बनवण्याची मागणी करण्यात आली होती.

केंद्राने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, याचिकांमध्ये संविधानांतर्गत मिळालेल्या कोणत्याही मूलभूत अधिकाराच्या उल्लंघनाचा उल्लेख नाही. तसेच, क्रीमी लेयरचा नियम एससी-एसटीवर लागू होतो असे कुठेही नमूद केलेले नाही. सरकारच्या मते, क्रीमी लेयरची संकल्पना केवळ ओबीसी आणि एसईबीसी आरक्षणाशी संबंधित आहे. सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी






११ ऑगस्ट रोजी रमाशंकर प्रजापती आणि इतरांच्या जनहित याचिकांवर केंद्र आणि राज्यांना नोटीस बजावली होती. याचिकेत म्हटले आहे की, एससी-एसटी कुटुंबातील एखाद्या सदस्याने यापूर्वीच घटनात्मक किंवा वरिष्ठ सरकारी पदाचा लाभ घेतला असेल, तर त्याच्या मुलांना आरक्षणाचा लाभ मिळू नये.

याचिकेत म्हटले आहे की, यामुळे आरक्षणाचा फायदा आर्थिकदृष्ट्या दुर्बळ लोकांपर्यंत अधिक समान रीतीने पोहोचू शकेल. त्याचबरोबर, याचिकेमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बळ लोकांना उप-श्रेणी मानून त्यांना प्रवेश आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली होती.

**संसदच बदलू शकते यादी**

सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाने स्पष्ट केले की, एससी आणि एसटीच्या यादीत कोणताही बदल केवळ संसदच करू शकते. राज्य सरकारे, न्यायालये किंवा इतर कोणताही प्राधिकरण असे करू शकत नाही. संविधानाच्या अनुच्छेद ३४१ आणि ३४२ नुसार, केवळ संसदेलाच कायदा करून कोणत्याही जातीला किंवा जमातीला यादीत समाविष्ट करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार आहे.

**याचिका चुकीच्या समजुतीवर**

केंद्राने म्हटले की, याचिका चुकीच्या समजुतीवर आधारित आहे कारण ती स्थापित कायद्याकडे दुर्लक्ष करते. सरकारने इंदिरा साहनी प्रकरणाचा हवाला देत म्हटले की, एससी, एसटी आणि ओबीसीची ओळख ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणावर आधारित आहे.

थोडक्यात

## सोशल मीडियावर केंद्राचा अंकुश

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्ससाठी आक्षेपार्ह आणि संवेदनशील मजकूर हटवण्याच्या मुदतीत मोठी कपात केली आहे. यापूर्वी अशा प्रकारच्या मजकुरावर कारवाई करण्यासाठी २४ तासांचा वेळ दिला जात होता, मात्र नव्या नियमांनुसार आता अवघ्या २ तासांच्या आत असा मजकूर प्लॅटफॉर्मवरून हटवणे बंधनकारक करण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ मध्ये १० फेब्रुवारी २०२६ रोजी सुधारणा करण्यात आल्या असून, त्या अंतर्गत हे नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. मुख्यत्वे डीपफेक आणि एआयच्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या बनावट किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीला डिजिटल विश्वात आळा घालणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे.

**नवीन बदल काय आहेत ?**

नग्नता किंवा एखाद्याची बनावट ओळख सांगणाऱ्या आक्षेपार्ह सामग्रीबाबतच्या तक्रारींवर पूर्वीच्या २४ तासांऐवजी आता २ तासांच्या आत कारवाई करावी लागणार आहे. न्यायालय किंवा सक्षम सरकारी प्राधिकरणाकडून वैध आणि सकारण आदेश प्राप्त झाल्यानंतर बेकायदेशीर मजकूर हटवण्यासाठी आधी ३६ तासांची मुदत होती; आता ही कारवाई ३ तासांच्या आत करावी लागेल.

**तक्रारींना उत्तर द्यावे लागेल**

याशिवाय सामान्यांच्या तक्रारींनाही तात्काळ उत्तर द्यावे लागणार आहे. वापरकर्त्यांच्या सामान्य तक्रारींचे निवारण करण्याची मुदत ७२ तासांवरून कमी करून ३६ तास करण्यात आली आहे.

## देशातील तरुणांना मोहन भागवतांच्या प्रमाणपत्राची गरज नाही



**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी मुंबईत जेन झी आणि जेन अल्फा पीढीतील तरुणांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आंदोलक जेन-झी ऑॅण्टिनॅशनल नाहीत असे मत मांडले. त्यांच्या या वक्तव्यावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली. काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी भागवतांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली.

राजधानी दिल्लीत संसद भवन परिसरात प्रियंका गांधी यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या की, देशातील तरुणांना आरएसएस प्रमुख मोहन भागवत जी यांच्याकडून कोणत्याही प्रमाणपत्राची गरज नसल्याचे त्यांनी सुनावले. दरम्यान, कर्नाटकचे मंत्री व काँग्रेस नेते प्रियांक खरगे यांनी देखील भागवत यांच्या वक्तव्यावर टीका केली. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत म्हटले की, आरएसएस आणि भाजप त्यांची भाषा बदलण्याचा प्रयत्न करत असले तरी त्यांची विचारसरणी बदलत नाही.

लोकांमध्ये फूट पाडणे आणि द्वेष नव्या स्वरूपात मांडणे हाच त्यांचा उद्देश असल्याचा घणाघात प्रियंका गांधी यांनी केला. लोकशाहीमध्ये आंदोलन हा एखाद्या मुद्द्यावर सहमती घडवून आणण्याचा एक मार्ग आहे. त्यात चुकीचे काही नाही. आपल्याकडे जेन-झी तरुणांनी केलेले आंदोलन हे त्यांना झालेल्या त्रासाविरुद्ध होते. त्यामुळे ते अण्टिनॅशनल ठरत नाहीत असे स्पष्ट मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडले होते.

## जेन झी देशाचे भविष्य, कंगनाचा 'यू टर्न'

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**
दिल्लीतील जंतर-मंतरवर झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर भाजप लोकसभा खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री कंगना रानावतने टीकेची राळ उठवली होती. जवळपास अख्खा देश तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभा होता, पण कंगना रनौत मात्र तरुणाईवर उलट-सुलट बरळत सुटली होती. काही दिवसांपूर्वीच जेन-झींना गटार जनरेशन म्हणणाऱ्या कंगनाने जनरेशन झेड बाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली. पण, यावेळी मात्र कंगनाचा सूर काहीसा बदलल्याचे पाहायला मिळाले.



जनरेशन झी बाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी केलेल्या वक्तव्या प्रतिक्रिया देताना भाजप खासदार कंगना रानावत म्हणाली की, जनरेशन झी ही आपल्या देशाची ताकद आणि एका अथार्न आपल्या देशाचं भविष्य आहे. मोहन भागवत अत्यंत आदरणीय आहेत आणि त्यांचे ज्ञान, अनुभव ऐकण्याची संधी आम्हाला अनेकदा मिळाली आहे. देशातील तरुण पीढी आपल्या संस्कृतीचे दूत म्हणून पुढे येत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.

झारखंडमधील विविध भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेबाबत रांचीमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनावर खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री कंगना रनौतनं तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. नवी दिल्लीतील संसद भवनाबाहेर माध्यमांशी बोलताना कंगना रनौत म्हणाली की आपली जनरेशन-झी मधील तरुण पिढी खरोखरंच विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करतेय. हे प्रकार अनेक दशकांपासून सुरू आहेत. सगळीकडेच सध्या अशीच परिस्थिती पाहायला मिळतेय. केवळ तमाशा करण्यासाठी पुढे येणारा काँग्रेस पक्ष झारखंडमध्ये मात्र कुठेच दिसत नाही, जिथे विद्यार्थी अत्यंत कठीण परिस्थितीत आहेत. राहुल गांधी अशा ठिकाणी भेट देत नाहीत, तरीही तरुणांना भडकवण्याची वेळ येते, तेव्हा देशासाठी धोका निर्माण करण्यात तेच सर्वात पुढे असतात.

## आखातात पुन्हा तणाव




**वृत्तसंस्था, तेहरान**
इराण आणि अमेरिकेतील संघर्ष पुन्हा एकदा सुरू झाल्याने आखातात सध्या तणावाचे वातावरण आहे. या संघर्षामुळे जगातील तेल वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतुकीबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये कच्चा तेलाच्या किमती पुन्हा एकदा वाढू लागल्या आहेत. शुक्रवारी आशियाई बाजारात ब्रेंट क्रूडच्या किमतीत १ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवण्यात आली आहे.

शुक्रवारी सकाळी ब्रेंट क्रूड ८४ सेंट्स म्हणजेच १.०२ टक्क्यांनी वाढून ८३.३३ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. तर दुसरीकडे, अमेरिकन वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडच्या किमतीतही ६९ सेंट्सची म्हणजे ०.८९ टक्के वाढ झाली असून ते ७७.९८ डॉलर प्रति बॅरलवर व्यवहार करत होते. गुरुवारी तेल बाजारात ३ डॉलरची मोठी वाढ झाली होती आणि शुक्रवारीही ही तेजी कायम राहिलेली पाहायला मिळाली. कच्च्या तेलाच्या दरात आलेल्या या तेजीमागे होर्मुझच्या समुद्रधुनीतील वाढता तणाव हे मुख्य कारण मानले जात आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस युद्ध सुरू होण्यापूर्वी जगातील एकूण कच्च्या तेलाच्या आणि एलएनजी जहाजांच्या वाहतुकीपैकी तब्बल २० टक्के वाहतूक याच मार्गाने होत होती.

इराणच्या संसदेत एक प्राथमिक विधेयक विचारधीन आहे. त्यानुसार अमेरिका, इस्त्रायल आणि त्यांच्याशी संबंधित शत्रू जहाजांना या समुद्रातून प्रवास करण्यास बंदी घालण्याचा विचार सुरू आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जहाजांवर त्यांच्या एकूण मालाच्या मूल्याच्या २० टक्क्यांपर्यंत मोठा दंड आकारण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय, इराणने या मार्गावरून जाणाऱ्या जहाजांवर ५ ते ७ टक्के प्रवास शुल्क आकारण्याची मागणी केली आहे, तर ओमान ३ टक्के शुल्कावर चर्चा करत आहे. मात्र, अमेरिकेने या मार्गावर कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

**युद्ध लवकर संपण्याचा दावा**

एकीकडे आखातात तणाव वाढत असताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हे युद्ध लवकरच संपुष्टात येईल अशी आशा व्यक्त केली आहे. मला वाटते हे युद्ध खूप लवकर संपेल. इराण आता फार काळ संघर्ष सुरू ठेवू शकेल अशी परिस्थिती नाही, असे व्हाईट हाऊसच्या ओव्हल ऑफिसमधून बोलताना ट्रम्प म्हणाले.









संपादकीय लेखणीतून...

# ठाकरे विरूद्ध शिंदे

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष नाव आणि धनुष्यबाण हे पक्षाचे निवडणूक चिन्ह नेमके कोणाचे, या खटल्याची अंतिम सुनावणी बुधवारपासून सुरू झाली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे (उबाठा)च्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सुमारे पावणे दोन तास अंतिम युक्तिवाद केला. या प्रकरणी विधानसभा अध्यक्ष आणि केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेले निकाल कसे चुकीचे आहेत, राज्यपालांचे आक्षेपार्ह निर्णय, पक्षप्रमुख व विधिमंडळ नेता यांच्या हक्कातील फरक, शिंदेंच्या १३ आमदारांची स्वेच्छेने फूट, गटाचे इतर पक्षात विलीन होणे, हे मुद्दे सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादात न्यायालयासमोर मांडले. राजकीय पक्ष आणि त्या पक्षाचा विधिमंडळ गट या दोन भिन्न बाबी आहेत. त्यामुळे पक्षाच्या विधिमंडळ गटात पडलेली फूट ही राजकीय पक्षात पडलेली फूट असे म्हणता येणार नाही, असा दावा सिब्बल यांनी या प्रसंगी केला. शिवसेना पक्षाची घटना आम्ही निवडणूक आयोगाकडे सादर केली होती.

त्यावरूनच उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री केले, त्यांचा शपथविधी झाला, त्यामुळे घटना आमच्याकडे नाही, हा आयोगाचा युक्तिवाद खरा नाही. शिवसेनेबद्दल ही सर्व माहिती निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे. २०१३ मध्ये उद्धव ठाकरे यांनी शिवसेना पक्षप्रमुख पदाची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर त्यांनी अनेक पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. एकनाथ शिंदे यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड उद्धव ठाकरे यांनीच केली होती. २० जून २०२२ मध्ये विधान परिषद निवडणुकीच्या वेळी एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या काही आमदारांनी पक्षादेश डावलून क्रॉस व्होटिंग केले. तेव्हा सुनील प्रभू शिवसेनेचे अधिकृत मुख्य प्रतोद (व्हीप) होते. त्यांचा आदेश डावलून या आमदारांनी पक्षशिस्तीचा भंग केला. त्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे ३१ आमदार प्रथम सुरतला आणि तेथून गुवाहाटीला गेले. हा योगायोग नाही. तिथे त्यांनी ठराव मंजूर करून एकनाथ शिंदे यांना गटनेते म्हणून कायम ठेवले. मुख्य प्रतोद पदावरून सुनील प्रभू यांना दूर करून भरत गोगावले यांची नियुक्ती केली. ही संपूर्ण प्रक्रियाच बेकायदेशीर आहे. पक्षाच्या घटनेचे उल्लंघन करणारी आहे.

कारण २१ जून (शिंदेंच्या बंडाच्या दुसऱ्या दिवशी) उद्धव ठाकरे यांनी पक्षाची बैठक बोलावून शिंदे यांना विधिमंडळ पक्षाच्या गटनेते पदावरून दूर करून त्यांच्या जागी अजय चौधरी यांची नियुक्ती केली होती, असा तपशीलवार घटनाक्रम सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादात न्यायालयाला सांगितला. शिंदे यांच्या बंडानंतर बंडखोर आमदारांवर काय कारवाई करायची याचा निर्णय घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर सोपवली होती. त्यांच्यासमोर झालेल्या सुनावणीतही हेच मुद्दे मांडण्यात आले होते. मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करत बंडखोरांना अपात्र ठरवण्यास नकार दिला. हा त्यांचा पक्षपातीपणा असल्याचा आरोप सिब्बल यांनी केला. तत्कालीन राज्यपालांची या संदभार्तील भूमिका संशयास्पद असल्याचे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने ओढले होते याचे स्मरण सिब्बल यांनी न्यायालयाला करून दिले. विधिमंडळ पक्ष हा राजकीय पक्ष असू शकत नाही. पक्षप्रमुखालाच विधिमंडळ पक्षाचा नेता आणि मुख्य प्रतोद बदलण्याचा अधिकार आहे. आमदारांच्या गटाला तो अधिकार नाही, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी सुनावणीदरम्यान केला. त्यावर, राजकीय पक्षातील बहुमत नेमके कशाला म्हणायचे, यासाठी स्पष्ट निकष असणे आवश्यक आहे. असे निकष निश्चित केल्यास पक्षफूट आणि पक्षचिन्हांवरील वाद वारंवार उद्भवण्यापासून रोखण्यास मदत होईल, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी नोंदवले. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमल्या बागची व न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर २०२४ मध्ये दाखल केलेल्या दोन याचिकांवर सुनावणी झाली.

या याचिकांमध्ये महाराष्ट्र विधानसभाध्यक्षांनी एकनाथ शिंदे गटातील आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार दिल्याच्या निर्णयाला तसेच केंद्रीय निवडणूक आयोगाने शिंदे यांचा अधिकृत शिवसेना पक्ष म्हणून मान्यता दिल्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. सुनावणी दरम्यान न्या. बागची यांनी पक्षचिन्हाचा अधिकार राजकीय पक्षाचा की विधिमंडळ पक्षाचा असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर, सिब्बल यांनी पक्षचिन्ह हा राजकीय पक्षाचाच अधिकार असून उमेदवारी अजार्साठीही पक्षाची अधिकृत मान्यता आवश्यक असते, असे सांगितले. त्यावर, न्या. बागची यांनी, केंद्रीय निवडणूक आयोगाने विधिमंडळ पक्षातील बहुमताचा विचार करण्याऐवजी राजकीय पक्षातील बहुमताचा विचार करायला हवा होता, असे निरीक्षण नोंदवत निवडणूक आयोगावर अप्रत्यक्ष ताशेरे ओढले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी, राजकीय पक्षातील बहुमत नेमके कसे ठरवायचे, त्याची व्याप्ती काय, याबाबत स्पष्ट निकष असणे आवश्यक आहे. पक्षघटना किंवा निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये यासाठी निश्चित सूत्र आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आमदारांच्या अपात्रतेवरील निर्णय देण्यास केलेल्या विलंबावरही सिब्बल यांनी टीका केली. दहाव्या अनुसूची अंतर्गत निर्णय वेळेत न झाल्याने संपूर्ण सरकारने कार्यकाळ पूर्ण केला. अशा परिस्थितीत दहाव्या अनुसूचीचा उद्देशच निष्फळ ठरतो, असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला.

या खटल्याचा निकाल शिंदे गटाच्या बाजूने लागला तर शिवसेना पक्ष व धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह त्यांच्याकडे राहू शकते. पण, निकाल त्यांच्या विरोधात गेला तर पक्ष नाव व चिन्ह ठाकरे गटाला बहाल करावे लागेल. असे असले तरी ठाकरे गटाकडून आताचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हे नाव व मशाल हे निवडणूक चिन्ह कायम ठेवण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसे झाले तर शिवसेना हे नाव व धनुष्य-बाण हे चिन्ह गोठवले जाऊ शकते. त्याचा राजकीय फटका शिंदे गटाला बसण्याची शक्यता आहे. कपिल सिब्बल यांनी शिंदे गटाचा पक्ष फोडण्याचा प्लानच उघड केला. शिंदे यांना उद्धव यांनीच तेव्हा नेता म्हणून नियुक्त केले होते, आपल्या कॅबिनेटमध्ये मंत्री केले होते. ठाकरे यांनीच त्यांना निवडणूक लढवण्यासाठी एबी फॉर्म दिला होता. मग उद्धव हे पक्षाचे अध्यक्ष नाहीत असे कसे म्हणता येईल? शिवसेनेवर शिंदे दावा कसा सांगू शकतात? असा युक्तिवाद सिब्बल यांनी केला. शिंदे यांनी पक्ष फोडून स्थापन केलेले ते सरकारच बेकायदेशीर असल्याचा सडेतोड दावा सिब्बल यांनी केला आहे.

# पाकिस्तानमध्ये पुन्हा एकदा लष्करी उठावाचे संकेत

पाकिस्तानमध्ये पुन्हा एकदा लष्करी उठाव किंवा मोठ्या सत्तांतराचे तीव्र संकेत मिळत आहेत. देशातील बिघडलेली सुरक्षा व्यवस्था, ढासळलेली अर्थव्यवस्था आणि अंतर्गत राजकीय संघर्षामुळे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर हे थेट सत्ता हाती घेण्याची किंवा 'घटनात्मक सत्तापालट' करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शेजारील पाकिस्तानमधून एक महत्त्वपूर्ण बातमी येत आहे. शहबाज शरीफ सरकारविरोधात बंड होण्याची जोरदार चर्चा आहे. दरम्यान, राजधानी इस्लामाबाद मोठ्या कंटेनर्सने सील करण्यात आली आहे. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर या बंडाचे सूत्रधार आहेत. पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे पद धोक्यात आले आहे, कारण त्यांचेच गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी सरकारविरोधात मोहीम सुरू केली आहे. असाही दावा केला जात आहे की, या बंडाचा आराखडा रावळपिंडीमध्ये आधीच तयार करण्यात आला आहे. पाकिस्तानमध्ये पुन्हा एकदा लष्करी उठाव किंवा मोठ्या सत्तांतराचे तीव्र संकेत मिळत आहेत. देशातील बिघडलेली सुरक्षा व्यवस्था, ढासळलेली अर्थव्यवस्था आणि अंतर्गत राजकीय संघषार्मुळे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर हे थेट सत्ता हाती घेण्याची किंवा 'घटनात्मक सत्तापालट' करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पाकिस्तानने आपल्या इतिहासात लोकशाही सरकारांची अनेक लष्करी उठावे पाहिली आहेत.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

अलीकडे, राजकीय अशांतता आणि ऑगस्ट २०२६ मध्ये शहबाज शरीफ सरकारविरोधात 'सौम्य उठावा'च्या अफवा तीव्र झाल्या असून, इस्लामाबादमध्ये कडक सुरक्षा उपाय आणि निर्बंध लादण्यात आले आहेत.

खरं तर, पाकिस्तानच्या शासनव्यवस्थेच्या "कोलमडण्या"बद्दल एक धक्कादायक विधान केल्यानंतर काही दिवसांतच, गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी आता आणखी एक मोठा खुलासा केला आहे. पाकिस्तानच्या इतिहासातील "सर्वात मोठा घोटाळा" उघडकीस आणल्याचा दावा करत नक्वी म्हणाले की, यामध्ये न्यायाधीशांपासून ते राजकारण्यांपर्यंत, सरकारी यंत्रणेतील अनेक प्रमुख सदस्यांचा समावेश आहे. जरी नक्वी यांनी यात सामील असलेल्यांची नावे उघड केली नसली तरी, त्यांच्या वाढत्या खळबळजनक विधानांमुळे पाकिस्तानमधील सत्तेची सूत्रे बदलणार आहेत का, याबद्दलच्या अटकळांना जोर चढला आहे.

पाकिस्तानमध्ये मोठ्या राजकीय उठावाच्या आणि सत्तापालटाच्या अफवा पुन्हा एकदा तीव्र झाल्या आहेत. गृहमंत्री आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसिन नक्वी यांनी देशाची शासनप्रणाली पूर्णपणे अयशस्वी झाल्याचे जाहीर करून इतिहासातील सर्वात मोठा घोटाळा झाल्याचा दावा केल्यानंतर इस्लामाबाद हादरले. नक्वी यांनी न्यायाधीश,



राजकारणी आणि नोकरशहांवर २१ वर्षांपासून लाच घेतल्याचा आरोप केला आणि कठोर कारवाईचा इशारा दिला. लष्करप्रमुख जनरल आसिम मुनीर यांच्या पाठिंब्याने नक्वी थेट शहबाज शरीफ सरकारला आव्हान देत आहेत.

पाकिस्तान इकॉनॉमिक समिटमध्ये गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी उघडपणे सांगितले की देशाची दशकांहून जुनी प्रशासकीय रचना पूर्णपणे कोलमडली आहे. त्यानंतर एका माध्यमाला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी दावा केला की पाकिस्तानच्या इतिहासातील सर्वात मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. त्यांनी सांगितले की न्यायाधीश, नोकरशहा, राजकारणी आणि बँकर्स गेल्या २१ वर्षांपासून लाच घेत आहेत. या प्रकरणात सामील असलेल्या प्रत्येकावर कठोर कारवाई करण्याचे वचन नक्वी यांनी दिले.

पाकिस्तानमधील सद्यस्थितीवर भाष्य करताना, भू-राजकीय आणि संरक्षण विश्लेषक संदीप उन्नीथन यांनी सांगितले की, मोहसिन नक्वी हे एका माध्यमप्रमुखापासून एका शक्तिशाली राजकारण्यामध्ये वेगाने रूपांतरित झाले आहेत. पंतप्रधान होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा खूप पूर्वीपासून आहे. मोहसिन नक्वी यांच्या या वक्तव्यांमागे लष्करप्रमुख जनरल असिम मुनीर यांचा थेट हात आहे. नक्वी हे जनरल मुनीर यांचे जवळचे नातेवाईक मानले जातात.

विश्लेषकांच्या मते, याच जवळच्या संबंधांमुळे मुनीर यांनी शहबाज सरकारला डावलून, संघर्षादरम्यान अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी नक्वी यांची आपले विशेष प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली.

### शहबाज यांना बाजूला सारण्याची तयारी

बलुचिस्तान आणि पाकिस्तान-व्याप्त काश्मीर मधील वाढता जनक्षोभ आणि नागरी अशांततेच्या पार्श्वभूमीवर, जनरल असिम मुनीर आपली पकड आणखी मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत. तज्ज्ञांचा असा अंदाज आहे की, मुनीर हे त्यांचे सहकारी मोहसिन नक्वी यांच्यामार्फत देशात नवीन प्रांत किंवा प्रशासकीय एकके तयार करण्यासाठी वातावरण निर्माण करत आहेत. परवेझ मुशर्रफ यांच्या पावलावर पाऊल ठेवत, मुनीर यांना राष्ट्रपती आणि संरक्षण दल प्रमुख म्हणून संपूर्ण सत्ता हस्तगत करण्याचा मार्ग मोकळा करून देणे, हे अंतिम उद्दिष्ट आहे.

देशातील उत्तरदायित्व आणि न्यायव्यवस्था सुधारण्यासाठी नक्वी यांनी नवीन प्रशासकीय प्रांतांच्या निर्मितीचे समर्थन केले आहे. पाकिस्तानी लष्कराच्या एका प्रवक्त्यानेही सुरक्षा आणि सुशासनाच्या दृष्टिकोनातून या प्रशासकीय पुनर्रचनेला पाठिंबा दिला आहे. तथापि, सत्ताधारी पीएमएल-एन आणि पीपीपी या मुद्द्यावर गप्प राहिले आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे दोन्ही पक्षांची राजकीय ताकद पंजाब आणि सिंध प्रांतांमधून येते. प्रांतीय सीमा बदलल्यास त्यांचा राजकीय प्रभाव कमी होऊ शकतो. मोहसिन नक्वी यांच्या सततच्या वक्तव्यांमुळे निराश झालेल्या पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. आसिफ म्हणाले की, नक्वी गेल्या तीन वर्षांपासून एका अत्यंत शक्तिशाली पदावर आहेत आणि ते पंतप्रधानांनाही उत्तरदायी नाहीत. ते उपहासाने म्हणाले की, जर एवढी शक्तिशाली व्यक्ती तक्रार करत असेल, तर इतर मंत्र्यांनी घरी जावे. आसिफ यांनी मंत्रिमंडळ आणि संसदीय अधिवेशनांमधील नक्वी यांच्या मर्यादित सहभागावरही टीका केली. त्यांनी दावा केला की, नक्वी केवळ दोन किंवा तीन मंत्रिमंडळ बैठकांना उपस्थित राहिले. आसिफ म्हणाले की, संसदेतही नक्वी यांची उपस्थिती खूपच कमी राहिली आहे. क्रिकेट चाहते त्यांच्या कामावर नाराज असल्याने, आसिफ यांनी नक्वी यांना त्यांच्या मंत्रालयात आणि पीसीबीमध्ये कार्यप्रणाली बदलण्यास सुरुवात करण्याचा सल्ला दिला.

पाकिस्तानच्या सत्ता रचनेतील सर्वोच्च स्तरावरील ही दरी आता लपून राहिलेली नाही. सध्या आसिम मुनीर यांच्याकडे पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणापासून ते अर्थव्यवस्थेपर्यंत सर्व गोष्टींवर अमर्याद सत्ता आहे. तज्ज्ञांच्या मते, नक्वी यांच्या माध्यमातून मुनीर यांनी शाहबाज शरीफ यांना खरा बॉस कोण आहे, याचा स्पष्ट संदेश दिला आहे.

इंडिया टुडेने भू-राजकीय आणि संरक्षण विश्लेषक संदीप उन्नीथन यांच्या हवाल्याने म्हटले आहे की, एका मीडिया सम्राटापासून पाकिस्तानच्या सर्वात शक्तिशाली राजकारण्यांपैकी एक म्हणून वेगाने उदयास आलेल्या नक्वी यांच्या मनात पंतप्रधान होण्याची महत्त्वाकांक्षा फार पूर्वीपासून होती. त्यांना नेहमीच आसिम मुनीर यांचा पाठिंबा लाभला आहे आणि ते लष्करप्रमुखांचे जवळचे नातेवाईक असल्याचे मानले जाते. त्यामुळे, मुनीर या परिस्थितीचा फायदा घेऊ शकले. विश्लेषकांचा असाही विश्वास आहे की, याच जवळच्या संबंधांमुळे मुनीर यांनी संघर्षादरम्यान अमेरिका आणि इराण यांच्यात मध्यस्थी करण्यासाठी नक्वी यांची विशेष दूत म्हणून निवड केली.

- ९५६१५९४३०६

# टिम इंडियाचा श्रीलंका दौरा आव्हानांनी भरलेला!

भारतीय संघ या महिन्यात दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी श्रीलंकेचा दौरा करणार आहे. ही मालिका १५ ऑगस्टपासून सुरू होईल. भारतीय संघासाठी ही 'करा किंवा मरा' अशी मालिका आहे. आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम फेरीत पोहोचण्याचा संघावर दबाव आहे. २०२३-२०२५ च्या चक्रात भारतीय संघ अंतिम फेरीत पोहोचण्यात अपयशी ठरला होता. जर भारताला डब्ल्यूटीसी २०२५-२०२७ च्या अंतिम फेरीच्या शर्यतीत टिकून राहायचे असेल, तर त्यांना कसोटी मालिकेत श्रीलंकेला पराभूत करावे लागेल. त्यानंतर इतर संघांविरुद्धही विजय मिळवणे आवश्यक असेल. तथापि, शुभमन गिलच्या संघासाठी हे सोपे नसेल. संघासमोर तीन मोठी आव्हाने आहेत.

### डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीपर्यंतचा मार्ग सोपा नाही

डब्ल्यूटीसी २०२५-२०२७ च्या चक्रात भारताचे नऊ कसोटी सामने बाकी आहेत. याचा अर्थ भारतीय संघाला अजून तीन कसोटी मालिका खेळायच्या आहेत. भारत या तीनपैकी दोन कसोटी मालिका परदेशात आणि एक मायदेशात खेळेल. श्रीलंका दौऱ्यानंतर, भारतीय संघ दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी न्यूझीलंडला

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

जाईल. यानंतर, भारत २०२७ च्या सुरुवातीला मायदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळेल. डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी भारताला या नऊ कसोटी सामन्यांपैकी सात सामने कोणत्याही परिस्थितीत जिंकावेच लागतील, जे संघासाठी एक कठीण काम आहे.

### श्रीलंकेविरुद्ध निर्भेळ विजय आवश्यक

डब्ल्यूटीसीच्या अंतिम फेरीच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी भारताला श्रीलंकेला कसोटी मालिकेत २-० ने पराभूत करावेच लागेल. जर भारतीय संघ असे करण्यात अपयशी ठरला, तर अंतिम फेरीपर्यंतचा मार्ग कठीण होईल. कोणत्याही परिस्थितीत, श्रीलंका दौऱ्यावरील कसोटी मालिका भारतासाठी सोपी नसेल. त्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागू शकते.

### गॉले एक कठीण परीक्षा असेल

भारत आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिका १५ ऑगस्ट रोजी सुरू होत आहे. पहिला सामना गॉलमध्ये खेळला जाईल. गॉलमधील खेळपट्ट्या फिरकीला साथ देत आहेत आणि भारतीय संघाच्या फलंदाजांना फिरकी



गोलंदाजांकडून कठीण आव्हानाला सामोरे जावे लागेल.

संघाच्या फलंदाजांना फिरकी गोलंदाजांविरुद्ध संघर्ष करावा लागला आहे. गेल्या दोन कसोटी मालिकांमध्ये, भारतीय फलंदाज न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेच्या फिरकी गोलंदाजांसमोर टिकू शकले नाहीत. भारतात झालेल्या या दोन्ही मालिकांमध्ये टीम इंडियाला मानहानीकारक पराभव पत्करावा लागला. श्रीलंकेचे फिरकी गोलंदाज गॉलमध्ये टीम इंडियासमोर आव्हान उभे करू शकतात. प्रभात जयसूर्या आणि रमेश मेंडिस हे असे दोन फिरकी गोलंदाज आहेत जे भारतीय फलंदाजांना अडचणीत आणू शकतात.

### गॉलेमधील भारताची कामगिरी

गॉलमधील भारताची कसोटी कामगिरी विशेष प्रभावी नाही. टीम इंडियाने आतापर्यंत तिथे पाच कसोटी सामने खेळले असून, त्यापैकी दोन जिंकले आहेत आणि तीन गमावले आहेत. या मैदानावर भारताचा शेवटचा कसोटी विजय २०१७ मध्ये झाला होता, ज्यात त्यांनी श्रीलंकेला ३०४ धावांनी पराभूत केले होते. भारतीय संघ नऊ वर्षांनंतर गॉलमध्ये कसोटी सामना खेळणार आहे.

### कोलंबोमधील भारताची कसोटी कामगिरी?

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसरा कसोटी सामना कोलंबोमधील सिंहलीज स्पोर्ट्स क्लब (एसएससी) मैदानावर खेळला जाईल. या मैदानावर टीम इंडियाची कसोटी कामगिरी चांगली आहे. भारताने तिथे नऊ कसोटी सामने खेळले असून, त्यापैकी तीन जिंकले आहेत आणि दोन गमावले आहेत. चार कसोटी सामने अनिर्णित राहिले.

कोलंबोची खेळपट्टी फिरकीला अनुकूल आहे. येथेही भारतीय संघाला फिरकी गोलंदाजांविरुद्ध संघर्ष करावा लागू शकतो. काही फलंदाज वगळता, उर्वरित भारतीय संघाला फिरकी खेळताना अडचणी येतात.

### भारतीय संघाचे अनेक खेळाडू जखमी

श्रीलंका दौऱ्यात शुभमन गिलच्या संघावर दबाव असेल. अनेक नियमित खेळाडू दुखापतीमुळे कसोटी मालिकेतून बाहेर आहेत. ३ ऑगस्ट रोजी जसप्रीत बुमराहने दुखापतीमुळे मालिकेतून माघार घेतल्याने भारतीय संघाला मोठा धक्का बसला. बुमराहच्या डाव्या गुडघ्याला दुखापत झाली असून तो अद्याप त्यातून सावरलेला नाही. इंग्लंड दौऱ्यात तो जखमी झाला होता आणि त्याच्या जागी आकिब नबीची निवड करण्यात आली आहे. नबीवर चांगली कामगिरी करण्याचा दबाव असेल.

बुमराह व्यतिरिक्त, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा आणि नितीश कुमार रेड्डी हे देखील जखमी आहेत. सुंदर आणि हर्षित राणा यांना हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली आहे, तर नितीश कुमार रेड्डी यांना क्वाड्रिसेप्सची (मांडीची) दुखापत आहे. हे सर्व खेळाडू त्यांच्या दुखापतींमुळे श्रीलंका दौऱ्यासाठी अनुपलब्ध होते.

या सर्व आव्हानांवर भारतीय संघ मात करण्यात यशस्वी होईल तेव्हाच पुढील सामन्यांचं महत्व टिकून राहिल अन्यथा या मालिकेबरोबरच टिम इंडियाचे २०२७ फायनल खेळण्याचे स्वप्न लोप पावेल. मायदेशात न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिकेच्या तुलनेने कमजोर फिरकी गोलंदाजांनी भारतीय फलंदाजाचे जीने मुश्किल केले होते. आता तर फिरकीच्या आखाड्यात तेही श्रीलंकेच्या मातब्बर फिरकीपटूंसमोर भारतीय फलंदाजांचा टिकाव लागणे कागदावर दिसतं तितके सोपे नाही; शिवाय संघाचा मुख्य कोच गौतम गंभीर कसोटी प्रशिक्षणात कच्चा असल्याचे वारंवार सिद्ध झाले असल्याने या दौऱ्यात संघाने विजय मिळविला तर तो मोठा चमत्कारच मानावा लागेल.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेची महाअंतिम फेरी व बक्षीस वितरण ९ ऑगस्टला

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेची महाअंतिम फेरी रविवार, ९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रंगणार आहे. प्राथमिक फेरीतून निवड झालेली उत्कृष्ट भजनी मंडळे अंतिम फेरीत आपली कला सादर करतील.

अंतिम फेरीनंतर सायंकाळी ५.३० वाजता बक्षीस वितरण सोहळा होणार असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते विजेत्या भजनी मंडळांना पारितोषिके प्रदान करण्यात येतील. याप्रसंगी अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरीचे सरचिटणीस पद्मश्री जनार्दनपंत बोथे गुरुजी यांची विशेष्ज्ञ उपस्थिती राहील. महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, राज्यसभा खासदार मायाताई इवनाते, सर्व आमदार संजय भेंडे, कृष्णा खोपडे, मोहन मते, प्रवीण दटके, परिणय फुके, डॉ. राजीव पोतदार, अरुण लखानी, आशिष देशमुख, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर तसेच, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, भाजप अध्यक्ष दयाशंकर तिवारी, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, हेमंत काळमेघ, ज्ञानेश्वर रक्षक, अशोक यावले, राजेश कुंभलकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

महाअंतिम फेरी आणि पारितोषिक वितरण सोहळ्याला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भजनी मंडळांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, जयप्रकाश गुप्ता, अविनाश घुशे, प्रा. राजेश बागडी, अशोक मानकर, डॉ. गौरीशंकर पाराशर, देवेंद्र यादव, शशांक खेकरे, दीपक खिरवडकर, बाळासाहेब कुळकर्णी, चेतन कायरकर, दिलीप जाधव, संदीप गवई, रेणुका देशकर, भोलानाथ सहारे, विलास त्रिवेदी, नितीन तेलगोटे, किशोर पाटील, मनीषा काशिकर, राजू कनाटे, योगेश बन, डॉ. श्रीरंग वराडपांडे, श्रद्धा पाठक, अभिजित कथले, सुजाता कठवते, दर्शना नखते, सुजाता खांबाता, प्रशांत दिवाणजी, धनश्री भोरकर, कविता इंगळे, कल्पना मनापुरे आणि समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### अशी आहेत बक्षिसे

स्पर्धेतील प्रथम विजेत्या मंडळाला ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ३१ हजार, तृतीय क्रमांकाला २५ हजार, चतुर्थ क्रमांकाला २१ हजार, पाचव्या क्रमांकाला १५ हजार, सहाव्या क्रमांकाला ११ हजार, तर सातव्या क्रमांकावरील मंडळाला ७ हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येकी ५ हजार रुपयांचे दहा उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात येतील.

### महिला भजनी मंडळांनी गाजवला तिसरा दिवस

खंजरीचा ठेका, टाळ-मृदंगाचा नाद आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रबोधनात्मक भजनांचा जागर करीत महिला भजनी मंडळांनी विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचा तिसरा दिवस गाजवला. दक्षिण, मध्य, पूर्व आणि पश्चिम नागपुरातील महिला भजनी मंडळांनी राष्ट्रसंतांची दमदार भजने सादर करीत श्री संताजी सभागृहातील वातावरण भक्तिमय केले. श्री संताजी सभागृहात सुरू असलेल्या या स्पर्धेत विदभार्तून तब्बल ४३४ भजनी मंडळांनी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेच्या आज तिसऱ्या दिवशी नागपूर शहर आणि नागपूर जिल्ह्यातील भजनी मंडळांची प्राथमिक फेरी पार पडली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिला भजनी मंडळांनी खंजरी, टाळ, तबला आणि हार्मोनियमच्या साथीने राष्ट्रसंतांच्या भक्ती, राष्ट्रप्रेम आणि समाजप्रबोधनपर रचना सादर केल्या.

## आ. संजय पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त साखरीटोला येथे विविध कार्यक्रम संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - प्रकाश टेंभरे**
आमदार संजयजी पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त ग्राम साखरीटोला येथे जिल्हा परिषद क्षेत्र कारुटोला अंतर्गत मोक्षधाम परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

त्यानंतर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, साखरीटोला येथे विद्यार्थ्यांसमवेत वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा देण्यात आल्या. या सामाजिक उपक्रमांद्वारे पर्यावरण संरक्षण आणि शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा विधायक संदेश देण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विमेन्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये टीएनएस इंडिया फाउंडेशनच्या कॉमर्स स्टडी फोरमचे उद्घाटन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
विमेन्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, नंदनवन येथे टीएनएस इंडिया फाउंडेशनच्या कॉमर्स स्टडी फोरमचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. विद्यार्थ्यांमध्ये वाणिज्य विषयाविषयी अभ्यासाची आवड निर्माण करणे, नेतृत्वगुण विकसित करणे तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांद्वारे त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविणे हा या फोरमचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमासाठी टीएनएस इंडिया फाउंडेशनचे प्रोग्राम स्पेशालिस्ट व प्रशिक्षक सिद्धार्थ पाटील आणि प्रिया प्रसाद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गायकवाड तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. श्यामकुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत फोरमच्या कायार्साठी शुभेच्छा दिल्यात. कार्यक्रमाचे आयोजन कॉमर्स विभागाच्या प्रमुख डॉ. अलका ब्राह्मणकर यांच्या मार्गदर्शनात विभागातील सर्व प्राध्यापकांनी केले. कार्यक्रमाचे संचालन वेदिका नाईक यांनी तर नाझिया यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी कॉमर्स स्टडी फोरमच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये भूमिका वर्मा यांची अध्यक्षपदी, भूमिका बंजारे यांची सचिवपदी, तर अल्फिया अंजुम, पलक धुरटकर आणि धारिया तबस्सुम शेख यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## मोकाट जनावरांच्या त्रासाने वाहनचालक हैराण!

### मोकाट जनावरे भररस्त्यावर ठाण मांडून बसल्याने अपघाताच्या धोका

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी - रुपेश खंडारे**
पारशिवनी शहरात मोकाट जनावरांच्या त्रासाने नागरिक, व्यावसायिक सारेच प्रचंड वैतागलेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजार चौक, बॅक ऑफ इंडिया, बसस्थानकए रस्त्यावर मोकाट जनावरांची बसलेल्या झुंडीमुळे वाहतुकीस अडथळा तर होतोच अपघातांनाही निमंत्रण मिळत आहे.



मोकाट गुरांच्या उपद्रवामुळे येथील नागरिकांसह येणारे पर्यटक,भाविक भक्त, वाहनधारक तसेच व्यावसायिक पुरते हैराण झाले आहेत. आधीच भटकी कुत्री व डुकरांचा उपद्रव आहे, त्यात आता मोकाट जनावरांची डोकेदुखी वाढल्याने त्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे. मात्र नगरपंचायत प्रशासन या समस्येकडे गांभिर्य पूर्वक लक्ष देत नसल्याने येणाऱ्या काळात मोठा अपघात होऊन निरपराध नागरीकांच्या जिवितास धोका होऊन जिवितहानी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

पारशिवनी नगरपंचायत प्रशासनाला या समस्येबाबत माहिती असुनही अधिकारी कर्मचारी या समस्येकडे कानाडो करताना दिसुन येत आहे.तर स्थानिक प्रतिनिधी सुद्धा डोळेझाक करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कित्येक दिवसांपासुन मोकाट जनावरांचे थवे मुख्य मार्गावर रस्ता अडवून अस्तव्यस्त बसले असल्याने वाहनचालकांना एक तर वाहत थांबवुन जनावरांना बाजुला करावे लागते किंवा रस्त्याच्या काठावरुन वाहने चालवावी लागत आहे. रात्रीच्या वेळी पारशिवनी सावनेर मार्गावरील पथदिवे बंद असल्याने या मार्गावर अंधार असल्याने वाहनचालकांना रस्त्यावरील मोकाट जनावरे दिसुन येत नसल्याने सदैव या मार्गावर मोठा अपघात होण्याची शक्यता असल्याने जिवितहानी होण्याच्या धोका निर्माण झाला आहे. नगरपंचायत प्रशासनाचे या गंभिर समस्येकडे लक्ष देऊन तात्काळ मोकाट जनावरांना बंदिस्त करुन गौशाला येथे पाठवावे. तसेच मोकाट जनावर मालकांवर कायदेशिर रित्या कारवाई करण्याची मागणी स्थानिक नगरवाशियानी केली आहे.

बाजरी चौक ते तहसिल मार्गावर कोंडवाडा असून तो नावालाच आहे. मोकाट जनावराच्या मालकावर दंडात्मक व अन्य कारवाई झालेली नाही. नगरपंचायत प्रशासन मोकाट जनावर पालकांसमोर लाचार झाल्याचे दिसुन येते.

**मोकाट जनावरे मालकांवर दाखल करा**

मोकाट जनावरांचा वाढता उपद्रव बघता ग्रामपंचायतीने केंद्र व राज्यशासनाच्या केंद्र, राज्याचे कायदे पशू क्रूरता नियम व अधिनियम १९६०, मुंबई पोलिस कायदा १९५१ अंतर्गत जनावरांच्या मालकांवर गुन्हे दाखल करावे तसेच बेवारस जनावरांची गोशाळेत रवानगी करावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.

**स्थानिक दुकानदार**

"मोकाट जनावरांमुळे आम्ही व्यावसायिक त्रस्त झालो आहोत. रोज सकाळी दुकान उघडताना पहिले या मोकाट जनावरांनी टाकलेले शेण, गोमूत्र साफसफाई करावी लागते. त्यामुळे संपूर्ण दुकानात माशी मच्छर व शेणगोमूत्राच्या वासाने आम्ही दुकानदार त्रस्त झालो आहोत.

## 'तुका झाला पांडुरंग' : सुरेल अभंग प्रस्तुतीने रसिक मंत्रमुग्ध




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'तुका झाला पांडुरंग' या सुरेल अभंग प्रस्तुतीला नागपूरकर रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सायंटिफिक सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या निवडक अभंगांच्या सुमधुर सादरीकरणातून संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. सुप्रसिद्ध गायक डॉ. साधना शिलेदार आणि डॉ. राहुल एकबोटे यांनी आपल्या भावपूर्ण आणि सुरेल गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. वारकरी संप्रदायाच्या भजनाचा ठेका, संत तुकाराम महाराजांच्या अभंगांमधील आध्यात्मिक संदेश आणि वाद्यवृंदाची उत्कृष्ट साथ यामुळे कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.

श्रोत्यांच्या आग्रहास्तव डॉ. राहुल एकबोटे यांनी सादर केलेल्या 'कानडा राजा पंढरीचा' या अभंगाला उत्स्फूर्त दाद मिळाली, तर डॉ. साधना शिलेदार यांनी भैरवी रागातील 'आपुल्या माहेरा जाईन मी आता' या अभंगाच्या सादरीकरणातून रसिकांना भावविवश केले. कार्यक्रमात एकूण १५ अभंगांचे सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमाची संकल्पना आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशनच्या संस्थापिका डॉ. वृषाली शिलेदार यांची होती. कार्यक्रमाचे संयोजन मानसी देशपांडे आणि डॉ. वंदना कुलकर्णी यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आद्यब्रह्मवादिनीच्या मुख्य संचालिका आरती महाजन आणि जयश्री धर्माधिकारी यांच्या हस्ते कलाकारांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात सौ. अंजली देशपांडे यांनी संस्थेच्या २०२३ ते २०२६ या तीन वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेत महिलांचे संघटन, सक्षमीकरण आणि विविध क्षेत्रांत व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने केलेल्या कार्याची माहिती दिली. राज्यभरातील सुमारे ३० हजार महिलांना संस्थेच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतल्याचे त्यांनी नमूद केले. अभंग प्रस्तुतीदरम्यान स्नेहा शिनखेडे यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा आध्यात्मिक आशय प्रभावी निवेदनातून उलगडला. गायकांना संवादिनीवर श्रीकांत पिसे, तबल्यावर निखिल मडावी, पखावजवर आशीष गायधन, तसेच सहतालवाद्यात गजानन रानडे आणि सोहम रानडे यांनी उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वंदना कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन मानसी देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवानी दिवाळे, हेमांगी जोशी, शिल्पा नाईक, कविता मोहरील, प्राची कुलकर्णी, डॉ. ज्योती शिवलकर आणि सौ. सुनीती मोहरील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सर्वांसाठी निःशुल्क असलेल्या या कार्यक्रमाला अभंगसंगीत रसिक, वारकरी संप्रदायाचे अभ्यासक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. भक्ती, संगीत आणि संत साहित्याचा सुंदर संगम घडविणारा हा कार्यक्रम उपस्थित रसिकांसाठी अविस्मरणीय ठरला.

थोडक्यात

## सुनील बावणे यांची गझल संमेलनाध्यक्षपदी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
बालाजी सरोज भावकाव्य मराठी साहित्य प्रतिष्ठान नागपूर, महाराष्ट्र राज्य आयोजित सेवाग्राम,जिल्हा वर्धा. सहाव्या मराठी साहित्य संमेलना निमित्ताने गझलसम्राट आदरणीय सुरेश भट यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्यस्तरीय गझल लेखन स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. नुकताच या राज्यस्तरीय गझल लेखन स्पधेर्चा निकाल बालाजी सरोज भावकाव्य मराठी साहित्य प्रतिष्ठान नागपूरच्या आयोजिका सरोज अंदनकर यांनी, परीक्षक जेष्ठ गझलकार बापू दासरी, नांदेड यांनी दिलेला निकाल जाहीर केला. त्यामध्ये पल्लवी उमरे प्रथम तर गझलकार कवी मान. सुनील बावणे - निल यांच्या गझलेला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.



येत्या नोव्हेंबर महिन्याच्या २८ आणि २९ तारखेला बापू कुटी सेवाग्राम वर्धा येथे दोन दिवसीय साहित्य संमेलनात यांचा सन्मान करण्यात येत आहे. तसेच दोन दिवसीय साहित्य संमेलनामध्ये विविध सत्राचे आयोजन करण्यात आले असून गझल मुशायरा सत्रात मान. सुनिल बावणे - निल यांची गझलसंमेलन अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली असून तशी घोषणा आयोजक मान. सरोज अंदनकर यांचेकडून करण्यात आली. सुनील बावणे - निल यांनी या साहित्य सेवेचा सन्मान केला जातोय असे मत व्यक्त केले आहे. या अगोदर सुध्दा विविध साहित्य संमेलनातून अनेक मानाची पदं, साहित्यिक कामगिरी सुनील बावणे - निल यांनी पार पाडली असून त्यांच्या या साहित्य सेवेचे नेहमीच महाराष्ट्रातील साहित्यिक, रसिक वर्ग, मित्र परिवार, कामगार क्षेत्रातून यांच्या नियुक्ती बद्दल, साहित्य सेवेबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

## ४ दिवंगत पत्रकारांसाठी रविवारी संयुक्त शोकसभा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दिवंगत ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मणराव जोशी, टी. बी. गोल्हर, विराग पाचपोर आणि मिलिंद ठेंगडी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता संयुक्त शोकसभा आयोजिण्यात आली आहे. टिळक पत्रकार भवन ट्रस्ट, नागपूर श्रमिक पत्रकार संघ आणि पत्रकार क्लब ऑफ नागपूर यांच्या वतीने प्रेस क्लब सभागृहात होर्णाय़ा या शोकसभेच्या अध्यक्षस्थानी राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे राहतील.

आमदार संजय भेंडे, डॉ. गिरीश गांधी, प्रकाश मेघे, सुधीर पाठक, विजय जावंधिया, किशोर तिवारी, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रफुल्ल गुडधे, प्रगती पाटील, प्रदीपकुमार मैत्र हे यावेळी शोकसंवेदना व्यक्त करतील.

## खंजेरी भजन स्पर्धेत वाडीच्या साई महिला भजन मंडळाने केला राष्ट्रसंतांच्या विचारांचा जागर



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे सक्करदरा येथील श्री संताजी सभागृहात आयोजित खंजेरी भजन स्पर्धेत वाडीच्या साई महिला भजन मंडळाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रभावी जागर करत उपस्थितांची मने जिंकली. या स्पर्धेत विदर्भाच्या कानाकोपऱ्यातील महिला, पुरुष व युवक भजन मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. राष्ट्रसंतांच्या समाजप्रबोधन, मानवता आणि ग्रामविकासाच्या विचारांना संगीताच्या माध्यमातून प्रभावीपणे सादर करण्यात आले.

स्पर्धेनंतर उत्कृष्ट तबलावादक डॉ. देवेंद्र यादव यांच्या हस्ते सहभागी भजन मंडळांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी तबल्यावर अरुण कराळे, संवादिनीवर राजेंद्र वाघ, गायनात शालू देवरे व संध्या वाघमारे, तसेच टाळकरी म्हणून अरुणा देशमुख, मंगला कडू, गीता थोटे आणि ज्योत्सना सगणे यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. वाडीच्या साई महिला भजन मंडळाच्या सुरेल सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद देत मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

## सालेकसा तहसील कार्यालयातील बैठकींमुळे नागरिकांची गैरसोय, बैठकींची वेळ बदलण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजू फुंडे**
सालेकसा तहसील कार्यालयात विविध शासकीय कामांसाठी तालुक्यातील दुर्गम तसेच नक्षलग्रस्त भागातून दररोज मोठ्या संख्येने नागरिक येत असतात. अनेक नागरिक २० ते ३० किलोमीटरचा प्रवास करून सकाळी ११ वाजेपर्यंत तहसील कार्यालयात पोहोचतात, जेणेकरून त्यांची शासकीय कामे वेळेत पूर्ण होतील. मात्र, काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, दुपारी सुमारे १२ वाजल्यानंतर तहसीलदारांच्या दालनात कर्मचाऱ्यांच्या बैठका घेतल्या जात असल्याने नियमित कामकाजावर परिणाम होतो. या बैठका दोन ते तीन तास चालत असल्याने बाहेरून आलेल्या नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. अनेकदा काम न झाल्याने त्यांना पुन्हा आपल्या गावी परत जावे लागते आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा तहसील कार्यालयात यावे लागते. त्यामुळे नागरिकांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाढत असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.



नागरिकांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, जर शासनाच्या नियमानुसार किंवा प्रशासकीय गरजेनुसार बैठका घेणे आवश्यक असेल, तर त्याची माहिती एक दिवस आधी तहसील कार्यालयातील सूचना फलकावर (ब्लॅकबोर्डवर) जाहीर करण्यात यावी. त्यामुळे दूरवरून येणाऱ्या नागरिकांना त्यानुसार नियोजन करता येईल. याशिवाय, नागरिकांनी बैठका दुपारी ३ वाजल्यानंतर घेण्याची मागणी केली आहे. त्यामुळे सकाळपासून दुपारपर्यंत सर्वसामान्य नागरिकांची शासकीय कामे वेळेत पूर्ण होतील आणि त्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागणार नाही. या संदर्भात सालेकसा तालुक्यातील नागरिकांनी जिल्हा प्रशासन व राज्य शासनाने लक्ष घालून जनहिताच्या दृष्टीने योग्य निर्णय घ्यावा, तसेच तहसील कार्यालयातील कामकाज अधिक लोकाभिमुख व वेळेत होईल अशी व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे.

**थोडक्यात**

## पीडित अल्पवयीनांची ओळख उघड केल्याप्रकरणी मनसेचे जिल्हा कामगार अध्यक्ष अमन अंदेवार यांच्यावर गुन्हा दाखल

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

लैंगिक अत्याचार प्रकरणातील पीडित अल्पवयीन बालकांची ओळख उघड करणारी माहिती व्हॉट्सॲपद्वारे प्रसारित केल्याप्रकरणी बल्लारपूर पोलिसांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा कामगार अध्यक्ष अमन आनंद अंदेवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बल्लारपूर पोलीस ठाण्यात यापूर्वी नोंद असलेल्या एका लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील पीडित अल्पवयीन बालकांची नावे आणि ओळख असलेली प्रेस नोट ६ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास एका मोबाईल क्रमांकावरून व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पत्रकारांसह इतर व्यक्तींना प्रसारित करण्यात आल्याची माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळाली.

या माहितीची पडताळणी केल्यानंतर संबंधित प्रेस नोटमध्ये पीडित अल्पवयीनांची ओळख उघड करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी संबंधित मोबाईल क्रमांकाच्या तांत्रिक तपासातून तो क्रमांक अमन आनंद अंदेवार रा. आंबेडकर वॉर्ड, बल्लारपूर यांच्या नावावर असल्याचे स्पष्ट झाले. लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) कायद्यानुसार पीडित बालकाची ओळख कोणत्याही माध्यमातून उघड करणे कायद्याने प्रतिबंधित असतानाही आरोपीने जाणीवपूर्वक प्रेस नोट सोशल मीडियावर तसेच पत्रकारांच्या व्हॉट्सॲप समूहांमध्ये प्रसारित करून पीडित बालकांची प्रतिष्ठा व सुरक्षितता धोक्यात आणल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. याप्रकरणी बल्लारपूर पोलीस ठाण्यात आरोपी अमन आनंद अंदेवार याच्याविरुद्ध पोक्सो कायदा, २०१२ मधील कलम २३(४) तसेच बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ च्या कलम ७४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, काल या प्रकरणी निलंबित माजी मुख्याध्यापक प्रेमानंद देशमुख यांना बल्लारपूर पोलीसांनी अटक केले होते. त्यांच्यावर प्रकरण लपवून ठेवल्याचे आरोप होता.

## कारमधून ३१ पेट्या दारू जप्त, बल्लारपूर पोलिसांची धडक कारवाई



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

बल्लारपूर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या धडक कारवाईत अवैध देशी व विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या ख्वाजा शेख उर्फ बडे मोहम्मद शेख ५२ वर्ष याला ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातील टाटा इंडिगो क्रं एमएच ३४ एए ६९०६ कारमधून ३० पेट्या देशी दारू व एक पेटी विदेशी दारू असा एकूण ३ लाख २८ हजार ७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्राप्त माहितीनुसार, गुरुवारी ६ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे राजेंद्र प्रसाद वॉडार्तील मक्का मस्जिद ते नाग मंदिर मार्गावर नाकाबंदी करण्यात आली. त्यावेळी संशयित वाहन थांबवून तपासणी केली असता वाहनात खाकी रंगाच्या बॉक्समध्ये मोठ्या प्रमाणात देशी व विदेशी मद्याचा साठा आढळून आला.तपासणीत रॉकेट संत्रा कंपनीची ९० मि.ली. देशी दारू, तसेच 'सह्याद्री गोल्ड प्रीमियम व्हिस्की' १८० मि.ली. आणि मुंबई माल्ट व्हिस्की' ९० मि.ली. च्या बाटल्या आढळून आल्या. संपूर्ण दारूसाठा आणि वाहन जप्त करून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (अ) अन्वये बल्लारपूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८२१/२०२६ नोंद करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे यांच्या पोलीस उपनिरीक्षक उमेश जोगदंड, पोअं महेश कुकुडकर, फुलचंद लोधी, शांतकुमार घोसे, लखन चव्हाण, मिलिंद आत्राम यांनी केले. दरम्यान, एवढ्या मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आलेली देशी व विदेशी दारू नेमकी कुठून आणण्यात आली होती, ती अधिकृत विक्रीची होती की बनावट होती, तसेच या साखळीमागील इतर संबंधितांवरही कारवाई होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

## खात येथे 'एक पेड़ माँ के नाम' उपक्रमांतर्गत भाजपाच्या वतीने वृक्षारोपण



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

'एक पेड़ माँ के नाम' या संकल्पनेतून भारतीय जनता पार्टी, खात यांच्या वतीने जिल्हा परिषद शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, हरित परिसर निर्मिती आणि भावी पिढीसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. वृक्ष हे केवळ पर्यावरणाचे रक्षण करणारे नसून, आपल्या पुढील पिढीसाठीची अमूल्य संपत्ती आहेत. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष मुकेश अग्रवाल, सरपंचा खात माधुरी वैद्य, माजी सरपंच कैलास वैद्य, उपसरपंच रवींद्र मांडरकर, ग्रामपंचायत सदस्या प्रियंका आंबीलढूके, राहुल वैद्य, ज्ञानेश्वर राठोड, लेखपाल पटले तसेच ग्रामपंचायत कर्मचारी आशीर्वाद ढोलवार यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनाचा हा संदेश प्रत्येक गावापर्यंत पोहोचवत 'एक पेड़ माँ के नाम' हा उपक्रम अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# पंचम नाट्य महोत्सवात मिळाली विनोदी एकांकिकाची मेजवानी





**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रंगभूमी नागपूर तर्फे सुरेश भट सभागृह रेशीमबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या पंचम एकांकिका महोत्सवात रसिकांना पाच विनोदी एकांकिकांची मेजवानी मिळली.

ज्येष्ठ रंगकर्मी रमेश लखमापूरे, गायिका श्रुती चौधरी, तसेच अपर्णा लखमापुरे, विलास कुबडे, संजय राहाटे, श्रद्धा तेलंग यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाला प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर विविध स्पर्धांमध्ये यशश्री प्राप्त केलेल्या पाच एकांकिकेचे सादरीकरण झाले यात साय रंगभूमी नागपूर तर्फे "३..२..१ स्टार्ट" ही मुग्धा पाथ्रडकर लिखित आणि शैल चौधरी दिग्दर्शित एकांकिका तसेच "व्यंजनची नवलाई" ही चंद्ररथ थिएटर्स, नागपूर द्वारा चंद्रकांत चौधरी लिखित आणि यशवंत चोपडे आणि भावना चौधरी दिग्दर्शित एकांकिका, "माहित नाही बॉ" ही वसंत केशव संस्था नागपूर द्वारा डॉ. अनिकेत मुनशी लिखित व दिग्दर्शित एकांकिका, रात्री "नामदेव पायरी" ही माणुसकी मल्टीपर्पज फाऊंडेशन, बुलढाणाद्वारा रविंद्र इंगळे लिखित आणि विजय सोनाने दिग्दर्शित एकांकिका, "खेळ मांडियेला" ही तांडव क्रिएशन, नागपूर द्वारा विशाल कदम लिखित आणि अभिषेक बेल्लारवार दिग्दर्शित या एकांकिकानी रसिकांची मने जिंकली.

समारोपीय सोहळ्याला ज्येष्ठ रंगकर्मी, चित्रपट दूरदर्शन कलावंत नरेंद्र शिंदे, मेघे ग्रुप ऑफ स्कूल्सच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आभा मेघे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबईचे कार्यकारी सदस्य संजय राहाटे, यांची उपस्थिती लाभली. एकांकिका सादरकर्त्या संस्थांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, रोख राशी देऊन सन्मानित करण्यात येणार आले. तसेच याप्रसंगी नागपुरातील ज्येष्ठ रंगकर्मी मृणाल पुराणिक यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी रशुध्दी बहुउद्येशिय सामाजिक शिक्षण संस्थेच्या सचिव सुनिता गजभिये, देवरावजी कुबडे सेवा प्रतिष्ठानच्या श्यामला कुबडे, कलाकिर्ती प्रशिक्षण संस्थेचा वंदना बांगरे, रुखमाई सेवा मंडळाचे अध्यक्ष विलास कुबडे, कलागौरव संस्थेच्या संगिता बानाईत, स्वरमंथनच्या विणा उकुंडे, राष्ट्रीय कलंगी शाहीर मंडळाचे मोरेश्वर मेश्राम, संत वारामाई महिला भजन मंडळ, धापेवाडाचे राजू भोयर, अजित बालक मंदिरचे मानेराव गुरुजी, आदर्श कलंगी शाहीर मंडळाचे ब्रम्हा नवघरे, प्रकाश शिवणकर, नागपूर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक अमित कुबडे होते.

प्रास्ताविक विलास कुबडे यांनी तर संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन तसेच आभार प्रदर्शन अनिल देव यांनी केले. महोत्सव यशस्वी आयोजनासाठी प्रशांत मंग्दे, अनिल देव, किशोर बत्तासे, अपर्णा लखमापूरे, दीप्ती भाके आदींचे सहकार्य लाभले.

## नामकरणाच्या प्रस्तावाबाबत लवकर कारवाई करावी : उपमहापौर लीला हाथीबेड

### उपमहापौर यांनी घेतला शहरातील चौक, रस्ते व उद्यानांच्या नामकरणासाठीचा आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर शहरातील विविध चौक, रस्ते, उद्याने, शाळा आणि इमारतींना थोर महापुरुष, समाजसेवक, ख्यातनाम राजकीय व्यक्ती तसेच स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांची नावे देण्याच्या संदर्भात नामकरण समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक उपमहापौर लिला हाथीबेड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

मनपा मुख्यालयातील उपमहापौरांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत समिती सदस्य दीपक पटेल, चंद्रकांत खंगार यांच्यासह झोनचे सहायक आयुक्त धनंजय जाधव, राजकुमार मेश्राम, नरेंद्र बावनकर, विजय थूल, प्रमोद वानखेडे, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे यांच्यासह झोनचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. बैठकीत उपमहापौर लिला हाथीबेड यांनी नामकरणाच्या या प्रक्रियेला गती देण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या संबंधित समितीमार्फत शहरातील सर्व दहाही झोनकडे एकूण ४१ प्रस्ताव पाठवण्यात आले असल्याचे सांगितले. उपमहापौर लिला हाथीबेड यांनी नामकरणाच्या प्रलंबित प्रस्तावासंदर्भातील सर्व कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी असे निर्देश दिले.

## प्राथमिक आरोग्य उपकेंद्र गिरोला येथे ८ ऑगस्ट रोजी लोकार्पण सोहळा




**दै. सिंहवाणी वृतत, सालेकसा -राजु फुंडे**

तालुक्यातील ग्रामपंचायत गिरोला येथे नव्याने उभारण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. संजयजी पुराम यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद गोंदियाचे उपाध्यक्ष तथा सभापती (आरोग्य व शिक्षण विभाग) मा. सुरेशजी हर्ष राहणार आहेत.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती सालेकसाच्या सभापती विनाताई कटरे, जिल्हा परिषद सदस्य विमलताई कटरे, पंचायत समिती सालेकसाचे उपसभापती जितेंद्रजी बल्हारे, पंचायत समिती सदस्य रेखाताई फुंडे , जिल्हा आरोग्य अधिकारी मा. डॉ. अभिजीत गोल्हर, तालुका वैद्यकीय अधिकारी मा. डॉ. स्वप्नील आत्राम, वैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र शहारे व मा. डॉ. बी. डी. बारई यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी ग्रामपंचायत गिरोलाच्या सरपंच रविता विश्वनाथ मेंढे, उपसरपंच दुर्योधन नंदलाल ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील मान्यवर नागरिक उपस्थित राहणार आहेत. या नव्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामुळे गिरोला व परिसरातील नागरिकांना दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असून, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना एन.आय.ओव्हरसीज कन्सल्टन्सीतर्फे मार्गदर्शन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

परदेशात एमबीबीएस शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या संधी, पारदर्शक प्रवेश प्रक्रिया आणि शिक्षणापासून ते पदवी प्राप्तीपर्यंतच्या सर्वंकष मार्गदर्शनाची माहिती देण्यासाठी एन.आय.ओव्हरसीजच्यावतीने पत्रकार परिषदेत संस्थेचे मार्गदर्शक नागपुरातील डॉ. उमंग कडू यांनी सविस्तर माहिती पत्रकारांना दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, रशिया, कझाकस्तान, उझबेकिस्तान, जॉर्जिया आणि किर्गिस्तान यांसारख्या NMC मान्यताप्राप्त देशांमध्ये एमबीबीएस शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व विश्वासार्ह प्रवेश प्रक्रिया उपलब्ध करून दिली जाते. विद्यापीठांच्या



निवडीबाबत विद्यार्थ्यांना योग्य माहिती देणे, प्रवेश प्रक्रिया तसेच १०० टक्के पारदर्शक मार्गदर्शन दिले जाईल. परदेशातील शिक्षणासाठी व्हिसा प्रक्रिया, प्रवास नियोजन, विमानतळावर स्वागत सुरक्षित प्रवास व्यवस्था, निवास, भारतीय भोजन, स्थानिक सिम कार्ड, बँक खाते उघडणे तसेच आवश्यक प्रशासकीय प्रक्रियांमध्येही संस्थेकडून मदत केली जाते.

याशिवाय परीक्षेची तयारी, भारतातील करिअरच्या संधी आणि पुढील वैद्यकीय शिक्षणाबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार. संस्थेने गेल्या सहा वर्षांत एक हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना यशस्वी मार्गदर्शन केले असून प्रवेशापासून पदवीप्राप्ती पर्यंत सातत्याने सहकार्य केले आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक मार्गदर्शन, सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आणि परदेशात शिक्षणादरम्यान आवश्यक त्या प्रत्येक टप्प्यावर मदत देण्यावर संस्थेचा भर असल्याचे डॉ. उमंग कडू यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. डॉ. कडू म्हणाले, "विद्यार्थ्यांचा प्रवास केवळ प्रवेश मिळाल्यानंतर संपत नाही, तर त्यांचे शिक्षण सुरक्षित, आत्मविश्वासपूर्ण आणि यशस्वी होईपर्यंत आमची जबाबदारी कायम राहते.

परदेशातील शिक्षणाचा संपूर्ण प्रवास विद्यार्थ्यांसाठी सुलभ आणि विश्वासार्ह करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." या पत्रपरिषदेत परदेशातील वैद्यकीय शिक्षणाबाबत विद्यार्थी, पालक आणि माध्यम प्रतिनिधींना विविध महत्त्वाच्या बाबींची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी योग्य माहितीच्या आधारे निर्णय घेऊन आपल्या वैद्यकीय करिअरची दिशा निश्चित करावी, असे आवाहनही यावेळी केले. पत्रपरिषदेला मंचावरील एन आय ओव्हरसीज कन्सल्टन्सीचे फाउंडर सुरेश कडू, सोबत रितेश तराने व नरेंद्र तायडे यांची उपस्थिती होती.

# रेशनसाठीची पायपीट अखेर थांबली!

### खराशी-गुमगावच्या नागरिकांना आता गावातच मिळणार धान्य; आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश, मनिष काटोले यांच्या मागणीची तहसील प्रशासनाकडून दखल; ८० ते ९० लाभार्थ्यांना मोठा दिलासा

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

रेशनच्या धान्यासाठी तब्बल चार ते पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या लोहारी सावंगा येथे जाण्याची वेळ येत असल्याने खराशी व गुमगाव येथील नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. वृद्ध, महिला, दिव्यांग आणि गोरगरीब लाभार्थ्यांना रेशनसाठी करावी लागणारी पायपीट आता अखेर थांबणार आहे. आता खराशी आणि गुमगाव येथील नागरिकांना त्यांच्या गावातच रेशनचे धान्य मिळणार आहे.

लोहारा व जुनेवाणी या गावांमध्ये आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या शिफारशीनुसार दरमहा गावातच रेशन धान्य वाटपाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर खराशी व गुमगाव येथेही गावातच धान्य वाटप सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. दोन्ही गावांतील सुमारे ८० ते ९० रेशन लाभार्थ्यांनी लेखी तक्रार करून आपली अडचण भाजपा जलालखेडा मंडळाचे उपाध्यक्ष मनिष वासुदेवराव काटोले यांच्याकडे मांडली.

**वाहनाअभावी लाभार्थ्यांची ससेहोलपट**

खराशी व गुमगाव येथील नागरिकांना धान्य घेण्यासाठी लोहारी सावंगा येथे जावे लागत होते. ग्रामीण भागात वेळेवर वाहनांची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक वृद्ध व महिलांना मोठी पायपीट करावी लागत होती. अनेकदा रेशन दुकान बंद असल्यास किंवा इतर कारणाने धान्य मिळाले नाही तर नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागत होते.

रेशनसारख्या अत्यावश्यक शासकीय सुविधेसाठी नागरिकांना एवढ्या दूर जावे लागू नये, अशी मागणी लाभार्थ्यांनी केली होती.



**मनिष काटोले यांच्या पाठपुराव्याला यश**

नागरिकांची समस्या लक्षात घेऊन मनिष काटोले यांनी तातडीने काटोल-नरखेड मतदारसंघाचे आमदार चरणसिंगजी ठाकूर यांच्याकडे पत्राद्वारे खराशी व गुमगाव येथे गावातच रेशन धान्य वाटप सुरू करण्याची मागणी केली.

आमदारांच्या मार्गदर्शनाखाली निलिमाताई सतीशजी रेवतकर, सदस्य दक्षता समिती, नागपूर जिल्हा, तसेच मनिष काटोले यांनी तहसील प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. या मागणीची प्रशासनाने सकारात्मक दखल घेत खराशी व गुमगाव येथे गावातच रेशन धान्य वाटप करण्याचे अधिकृत आदेश जारी केले आहेत.

**असे असेल रेशन वाटपाचे वेळापत्रक**

तहसीलदारांच्या आदेशानुसार स्वस्त धान्य दुकानदार तपेश्वर रगतपुरे हे ई-पॉस मशीनद्वारे गावातच धान्य वाटप करणार आहेत.

खराशी : दर महिन्याला ११ व १२ तारीख

गुमगाव : दर महिन्याला १३ व १४ तारीख

त्यामुळे आता या दोन्ही गावांतील लाभार्थ्यांना रेशनसाठी लोहारी सावंगा येथे जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

**प्रवासाचा खर्च अन् वेळही वाचणार**

गावातच रेशन धान्य उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा प्रवासाचा खर्च, वेळ आणि श्रम वाचणार आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी हा निर्णय मोठा दिलासा देणारा ठरणार आहे.

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना अनावश्यक त्रास सहन करावा लागू नये, यासाठी गावपातळीवरच सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**नागरिकांची अडचण सोडवणे हाच पाठपुराव्याचा उद्देश**

खराशी आणि गुमगाव येथील जवळपास ८० ते ९० लाभार्थी माझ्याकडे लेखी तक्रार घेऊन आले होते. चार-पाच किलोमीटर दूर जाऊन रेशन आणताना वृद्ध, महिला व गोरगरीब नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे आमदार चरणसिंग ठाकूर साहेबांकडे तातडीने मागणी केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तहसील प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतला. आता गावकऱ्यांना गावातच रेशन मिळणार असल्याचा मनापासून आनंद आहे, अशी प्रतिक्रिया मनिष वासुदेवराव काटोले यांनी व्यक्त केली.

खराशी व गुमगाव येथील नागरिकांची वर्षानुवर्षांची समस्या मार्गी लागल्याने दोन्ही गावांमध्ये समाधानाचे वातावरण असून, नागरिकांनी आमदार चरणसिंग ठाकूर, निलिमाताई रेवतकर, मनिष काटोले आणि तहसील प्रशासनाचे आभार मानले आहेत.

थोडक्यात

## आ. संजय पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त तालुका पत्रकार संघटनेचा सामाजिक उपक्रम

### गरजूंसाठी मच्छरदाणी, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा



आमदार संजय पुराम यांच्या वाढदिवसानिमित्त तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने वाढदिवसाचा उत्सव सामाजिक बांधिलकी जपत जनसेवेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. यावेळी गरजू नागरिकांना मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात आले, तर शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. या सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र, सालेकसा येथे उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांचीही भेट घेण्यात आली. रुग्णांना मच्छरदाणी तसेच फळांचे वाटप करून त्यांच्या आरोग्याची आस्थेने विचारपूस करण्यात आली. पत्रकार संघटनेच्या या उपक्रमामुळे गरजू नागरिकांसह रुग्णांना दिलासा मिळाला. जनप्रतिनिधींचा वाढदिवस केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू घटकांना मदत करण्याच्या माध्यमातून साजरा व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे तालुका पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून पत्रकारिता क्षेत्रासोबतच समाजहिताच्या कार्यातही सक्रिय सहभाग घेण्याचा संघटनेचा प्रयत्न असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली, तर गरजू नागरिक व रुग्णांना मच्छरदाणी आणि फळांचे वाटप करण्यात आल्याने परिसरात या उपक्रमाचे कौतुक होत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमातून 'सेवा हीच खरी सामाजिक बांधिलकी' असा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रकाश टेंभरे, कार्याध्यक्ष गुनाराम मेहर, सचिव गुलशन बनोठे, यशवंत शेंडे, दिनेश मानकर, राजकुमार मच्छिरके, किशोर वालदे, अमित वैद्य, रविकुमार सोनवाने, महेंद्र रंगारी यांच्यासह संघटनेच्या अनेक पत्रकारांनी सक्रिय सहभाग घेतला.

## स्थानिक गुन्हे शाखा, गोंदियाची धडाकेबाज कामगीरी



दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-प्रकाश टेंभरे

दिनांक ०५/०८/२०२६ रोजी फियार्दी नामे कॉमेन्द्र खेमराज मेंढे राहणार डोंगरगाव जिल्हा गोंदिया यांनी पोलीस स्टेशन सालेकसा येथे तक्रार दिली की दिनांक ०२/०८/२०२६ ते ०३/०८/२०२६ रोजी रात्री दरम्यान सलोनी पेट्रोल पम्प सावली येथे ठेवलेले ०३ ट्रक व ०१ ट्रॅक्टर मधील असे एकूण ७ बॅटरी कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने पोलीस स्टेशन सालेकसा येथे अपराध क्रमांक ३७६/२६ कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल करण्यात आले होते .

सदर गुन्ह्यांचा गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधिक्षक गोंदिया गोरख भामरे यांचे निदेर्शाप्रमाणे व पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे, स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया यांचे मार्गदर्शनात दिनांक ०७/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, गोंदिया येथील पोलीस पथक पोलीस स्टेशन सालेकसा येथे अपराध क्रमांक ३७६/२६ कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता मधील अज्ञात आरोपीचा शोध घेत असतांनी गुप्त बातमीदारांकडुन माहीती प्राप्त झाली की, ग्राम छोटा गोंदिया येथील राहणारे १) आतिष शंकर रहांगडाले वय ३१ वर्ष रा. छोटा गोंदिया याने २) ऋत्विक बस्तीराम कंटकार वय २५ वर्ष रा.छोटा गोंदिया याचे सह मिळून आमगाव ते देवरी रोडवरील ग्राम सावली येथून काळे पेट्रोल पम्प चे जवळून ट्रक व ट्रॅक्टर चे एकूण ७ बॅटरी चोरी केली आहे. अशी माहिती मिळाल्याने आतिष शंकर रहांगडाले वय ३१ वर्ष रा. छोटा गोंदिया , ऋत्विक बस्तीराम कंटकार वय २५ वर्ष रा.छोटा गोंदिया यांना छोटा गोंदिया परिसरातून ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने चारचाकी वाहन भाडयाने घेऊन त्याने स्वतः चालवून ऋत्विक बस्तीराम कंटकार वय २५ वर्ष रा.छोटा गोंदिया याचे सह मिळून ग्राम सावली येथून काळे पेट्रोल पम्पचे जवळून ट्रक व ट्रॅक्टर चे एकूण ७ बॅटरी चोरी करून कैलास संजय चौधरी वय ३५ वर्ष राहणार प्रिन्स चौक फुलचूर याचे कबाडी दुकानात विकले आहे.

त्यानुसार कैलास संजय चौधरी वय ३५ वर्ष राहणार प्रिन्स चौक फुलचूर याचे कबाडी दुकानातून गुन्ह्यातील चोरी गेलेल्या बॅटरी जप्त करण्यात आलेले आहेत सदरची कामगीरी गोरख भामरे, पोलीस अधिक्षक, गोंदिया, अभय डोंगरे, अपर पोलीस अधिक्षक गोंदिया, स्थानिक गुन्हे शाखा गोंदियाचे पोलीस निरीक्षक श्री रेवचंद सिंगनजुडे यांचे मार्गदर्शनात पो.हवा. सुबोधकुमार बिसेन, पो.हवा. विठ्ठल ठाकरे, पो.हवा.दिक्षीतकुमार दमाहे,पो.हवा. संजय चौहान, पो.शी. हंसराज भांडारकर, पो.शि.छगन विठ्ठले,पो.शि. चापोशि. राम खंदारे, सर्व स्थानिक गुन्हे शाखा गोंदिया यांनी केली आहे.

# एका आठवड्यानंतर ३ आरोपींना अटक

### खापरखेडा मुख्य बाजारपेठ गॅंगवार प्रकरण, २ अल्पवयीन ताब्यात दगडी चाळ टोळीचा मोहरक्या सूरज कावळे व टोळी फरार, तिन्ही आरोपींची तुरुंगात रवानगी





गंभीर जखमी हिमांशू कडू

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

येथील मुख्य बाजारपेठेत घडलेल्या रक्तरंजित गॅंगवार प्रकरणात अखेर एका आठवड्या नंतर खापरखेडा पोलिसानी ३ आरोपींना अटक केली असून २ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले असून तिन्ही आरोपींची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे मात्र दगडी चाळ टोळीचा मोहरक्या कुख्यात सूरज कावळे व शुभम उर्फ शेरू उईके आणि त्यांची टोळी फरार असून खापरखेडा पोलीस अटक कधी करणार? असा संतप्त सवाल नागरिकांनी केला आहे

मोहन ठाकूर खुरावत वय २५ रा निंबा ता पारशिवनी, प्रियांशु विद्याधर रक्षित वय १८ वार्ड क्रमांक २ खापरखेडा, युगांत राजेश सारवे वय १९ वार्ड क्रमांक १ चिचोली असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून दोन अल्पवयीन आरोपीना ताब्यात घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

२ ऑगस्ट रविवारला रात्रीच्या सुमारास नागपूर जिल्हा व ग्रामीण भागातून ६ महिन्यांसाठी तडीपार करण्यात आलेला कुख्यात गुंड सूरज कावळे, शुभम उर्फ शेरू उईके व त्यांच्या दगडी चाळ टोळीतील गुंडांनी तलवार, चाकू फावड्यानी तीन तरुणांवर प्राणघातक हल्ला केला होता

सदर हल्ल्यात हिमांशू कडू, रोहित मेश्राम, रक्षित कापसे गंभीर जखमी होते यापैकी हिमांशू कडू यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे.

दगडी चाळ टोळीचे टार्गेट सुमित, डगग्म व त्याचे साथीदार होते मात्र ते सापडले नाहीत मातामय मंदिराजवळ उभा असलेला हिमांशू कडू याच्यावर हल्ला केला त्याला वाचविण्यासाठी गेलेल्या रोहित मेश्राम व रक्षित कापसे जखमी झाले होते.

आरोपी मोहन ठाकूर खुरावत हा वायलर व्हिडीओ मध्ये निपन्न झाल्यामूळे पारशिवनी पोलिसांच्या मदतीने मोहन ठाकूर याला खापरखेडा पोलिसानी ताब्यात घेतले मुख्य बाजारपेठेतील गॅंगवार हल्ला प्रकरणात जवळपास ४० ते ५० गुंड होते त्या सर्वांनी दुचाकीने मुख्य बाजारपेठेत दहशत निर्माण केली होती. मुख्य बाजारपेठेतील रक्तरंजित गॅंगवार खापरखेडा पोलिसांच्या अंगलट येण्याची चिन्हे आहेत त्यामूळे आपली अब्रू वाचविण्यासाठी निष्पाप लोकांचा बळी घेण्याची शक्यता असून पुढील तपास सुरू आहे.

**वॉर्ड क्रमांक २ च्या नागरिकांची याचना**

वॉर्ड क्रमांक २, खापरखेडा येथील सर्व त्रस्त रहिवासी यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच पोलिस आयुक्त यांना निवेदन सादर करणार आहेत की, खापरखेडा परिसरात कायदा व सुव्यवस्था ऐरणीवर आली असून सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आरोपीवर ममोका अंतर्गत कार्यवाही करण्याचे आदेश द्यावे व दोषी पोलीसांना तात्काळ सेवेतून निलंबित करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे. भागात वाढत्या गुन्हेगारीमुळे येथील जनता दहशतीत आहे.

## ...अखेर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना यश!

### ERP द्वारे थेट खात्यात वेतन आणि १०% पदभरतीला मंजुरी!



दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी

राज्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत आनंदाची आणि हक्काच्या संघर्षाला मोठे यश मिळवून देणारी बातमी समोर आली आहे. मागील दोन वर्षांपासून महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियन एनजीपी ४५११ आणि सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तीव्र लढा व पाठपुराव्यामुळे कर्मचाऱ्यांच्या दोन महत्त्वाच्या मागण्यांना मंजुरी मिळाली आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन आता जिल्हा परिषद, पंचायत समिती अशा स्तरांवर न अडकता ईआरपी अंतर्गत एफ्छ प्रणालीद्वारे एकदा हजेरी भरली की थेट कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा होणार आहे, तर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या १०% पदभरती संदर्भातील फाईलवर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी अंतिम मंजुरी दिली आहे. या दोन्ही महत्त्वपूर्ण निर्णयांचे अधिकृत शासन निर्णय पुढील आठवड्यात निर्गमित होणार आहेत.

विधानपरिषदेत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे प्रश्न अतिशय आक्रमकपणे मांडणारे महाराष्ट्रातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे राज्याध्यक्ष आमदार बच्चू कडू आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र पाठपुरावा करणारे राज्य सरचिटणीस गिरीश दाभाडकर यांच्या नेतृत्वामुळेच हा ऐतिहासिक विजय शक्य झाला आहे.

तसेच या संपूर्ण लढ्यामध्ये संघटनेच्या सर्व प्रमुख राज्य पदाधिकारी कार्याध्यक्ष काजी अल्लाउद्दीन, उपाध्यक्ष दिलीप डिके, दत्ता भोईर, सचिव अशोक कुथे,कोषाध्यक्ष विकास भोईर सह संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या पाठींब्यामुळे व कर्मचाऱ्यांच्या एकजुटीमुळेच हा लढा यशस्वी झाला आहे अशी माहिती प्रसिद्धीकर्ते मार्गदर्शक अशोक कुथे यांनी आज शुक्रवार (ता. ७ ऑगस्ट)ला दिली.

शासनाच्या या निर्णयाचे विभागीय अध्यक्ष जयदेव आंबूलकर, विभागीय सचिव दर्शन डोंगरे, जिल्हाध्यक्ष दत्ता भोयर, जिल्हासचिव सतिस वाघमारे, जिल्हाउपाध्यक्ष दिलीप धांडे, जिल्हाउपाध्यक्ष सुरेश मुन, कार्याध्यक्ष अनिल जी. आंबोने, जिल्हा सहसचिवक्ष मंगेश भोतमांगे, कोषाध्यक्ष प्रवीण वाहने, संघटक कमलाकर गुरधे, जिल्हा सदस्य आशिष वैद्य, प्रमोद तांडेकर, आशुतोष रंगारी, गोपाल तकित,विलास खंडार सह सर्व नागपूर जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष, सचिव आणि जिल्ह्यातील कर्मचारी यांनी आनंद व्यक्त केले असून आभार मानले आहेत.

## ३० चमूंमध्ये रंगणार राज्यस्तरीय 'खासदार चषक' आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेची अंतिम फेरी

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते १६ ऑगस्ट रोजी बक्षिस वितरण



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बालकला अकादमी आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा प्रथमच राज्यस्तरावर आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय खासदार चषक आंतरशालेय देशभक्तीपर समूहगान स्पर्धेची स्पर्धेची अंतिम फेरी रविवार, १६ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे रंगणार आहे.

सुरेश भट सभागृहात नुकत्याच पार पडलेल्या प्राथमिक फेरीत नागपूर शहर व जिल्ह्यासह मुंबई, पुणे, ठाणे, देवाची आळंदी, धामणगाव, अमरावती, वर्धा, वरूड, उमरेड, यवतमाळ, सावनेर, भिवापूर, चंद्रपूर, बुलढाणा आदी ठिकाणांहून १०६ शालेय चमूंनी सहभाग घेतला. त्यातून एकूण ३० चमूंची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली आहे. यात इयत्ता पहिली ते पाचवीच्या 'अ' गटातील १० चमू, तर इयत्ता सहावी ते दहावीच्या 'ब' गटातील २० चमूंचा समावेश आहे.

रविवारी सायंकाळी ५.३० वाजता होणाऱ्या बक्षीस वितरण सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची तसेच, महापौर नीता ठाकरे यांची विशेष उपस्थिती राहील. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके, विजेत्या संघांना प्रतिष्ठेचा खासदार चषक प्रदान करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील प्रत्येक सहभागी चमूला प्रशस्तीपत्र देण्यात येणार असून अंतिम फेरीतील विजेत्या चमूंमधील प्रत्येक विद्यार्थ्याला रोख पारितोषिक दिली जाणार आहेत.

अंतिम फेरी व बक्षिस वितरण कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रविंद्र फडणवीस व बालकला अकादमीच्या अध्यक्ष मधुरा गडकरी यांनी केले आहे.

## सर्पमित्रांच्या सहाय्याने अजगराला मिळाले जीवनदान

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर :** पावसाळा सुरु होताच शेतासह रहवासी क्षेत्रात साप निदर्शनास येऊ लागतात. व साप दिसताच



सर्वांचीच तारंबळ उडून मनात भितेचे वातावरण निर्माण होऊन काही म्हणतात मारुन टाका तर काही लगेच सर्पमित्रांना संपर्क करुण त्यांच्या माध्यमातून सापाला जिवनदान देण्याचे प्रयत्न करतात अशीच घटना शहरालागतच्या बोरुजवाडा येथे घडली.जवळपास आठ दहा फुट लांबीचा भिमकाय अजगर पाणठेल्या खाली असल्याचे आढळताच सर्पप्रेमींनी सर्पमित्र व हितज्योती आधार फाऊंडेशनचे हितेश बनसोड यांना सुचना दिली असता त्यांनी सर्पमित्र शुभम ठाकूर यांना सोबत घेत घटनास्थळी पोहचुन अजगराला मोठ्या शिफातेने पकडून त्यास खापा वन परिक्षेत्रात सुरक्षीत रित्या सोडून त्याच्या जिवीतेचे रक्षण केले. सर्पमित्र हितेश बनसोड व शुभम ठाकूर यांनी जवळपास आठ दहा फुट लांब भिमकाय अजगर प्रजातीच्या सपार्ला सुरक्षीत रित्या रेस्क्यू करुण जीवनदान दिल्याबद्दल सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## रोहण्यातील मेंढ्या-बकऱ्यांची चोरी उघड; १० आरोपी जेरबंद!

### ३ विधीसंघर्षग्रस्त बालकांचाही सहभाग; ९ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त, हातपाय बांधून पशुपालकाला जीवे मारण्याची धमकी; स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

रोहणा येथे मध्यरात्री गोठ्यात घुसून मेंढ्या-बकऱ्या चोरून नेणाऱ्या टोळीचा नागपूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेने पदार्फाश केला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तब्बल १० आरोपींना अटक केली असून तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली वाहने, मोबाईल फोन आणि जनावरांच्या विक्रीतून मिळालेली रोख रक्कम असा तब्बल ९ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जलालखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रोहणा येथील मारोतराव बांबल यांच्या शेतातील गोठ्यावर सोमवारी, ३ ऑगस्टच्या मध्यरात्रीच्या सुमारास आरोपींनी धाड टाकली. गोठ्यावर असलेल्या व्यक्तीचे हातपाय बांधून त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर गोठ्यातील ४५ मेंढ्या व १६ बकऱ्या पिकअप वाहनात भरून जबरीने चोरून नेण्यात आल्या. या घटनेमुळे परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नागपूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले. पोलिस निरीक्षक अंकुश माने यांच्या नेतृत्वाखाली तीन विशेष पथके तयार करण्यात आली.

तांत्रिक तपासातून टोळीचा माग पोलिसांनी घटनास्थळापासून जलालखेडा, वरूड, आष्टी, मोर्शी, तळेगाव व मोवाड परिसरात तपासाची चक्रे फिरविली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढला. तपासात देवेंद्र उर्फ भुऱ्या राजेंद्र पवार, रा. उमठा पारधी बेडा, जलालखेडा याचा साथीदारांसह गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले.

शुक्रवारी जलालखेडा-वरूड मार्गावर एका पांढऱ्या रंगाच्या हुंडाई आय-२० कारमध्ये देवेंद्र उर्फ भुऱ्या पवार याच्यासह त्याचे काही साथीदार आढळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता चोरीचा प्रकार उघडकीस आल्याचे पोलिसांनी सांगितले.

**नंबर प्लेट झाकून रचला चोरीचा कट**

पोलिस तपासानुसार आरोपींनी पूर्वनियोजन करून चोरीचा कट रचला होता. पिकअप वाहनाच्या नंबर प्लेटवर पट्ट्या लावून क्रमांक झाकण्यात आला होता. काही आरोपी गोठ्याकडे पायी गेले, त्यांनी तेथील व्यक्तीला धमकावून त्याचे हातपाय बांधले. त्यानंतर पिकअप गोठ्याजवळ आणून मेंढ्या व बकऱ्या वाहनात भरून नेण्यात आल्या. चोरी केलेली जनावरे विक्रीसाठी इतर साथीदारांच्या मदतीने बाहेर पाठविण्यात आल्याचेही तपासात समोर आले आहे.

**पूर्वीच्या चोरीच्या गुन्ह्याचीही माहिती**

आरोपी संतोष रामसिंग चव्हाण आणि देवेंद्र उर्फ भुऱ्या पवार यांचा जलालखेडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील यापूर्वीच्या बकरी चोरीच्या गुन्ह्यातही सहभाग असल्याची माहिती तपासादरम्यान समोर आली आहे. त्यामुळे ही टोळी पशुधन चोरीचे गुन्हे सातत्याने करीत होती का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

**वाहने, मोबाईल आणि रोख रक्कम जप्त**

पोलिसांनी महिंद्रा बोलेरो पिकअप, हुंडाई आय-२० कार, होंडा युनिकॉर्न मोटारसायकल, सात मोबाईल फोन तसेच जनावरे विक्रीतून मिळालेली रोख रक्कम असा एकूण ९ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये संतोष चव्हाण, देवेंद्र उर्फ भुऱ्या पवार, सतीश जाधव, रोशन चव्हाण, सोन्याजी पवार, पवन पवार, लखन उर्फ लोकेश भोसले, वैभव माहोरे, अंकुश उर्फ चेतन पोकळ आणि योगेश सरोदे यांचा समावेश आहे. याशिवाय तीन विधीसंघर्षग्रस्त बालकांचा सहभाग निष्पन्न झाला आहे. या प्रकरणात भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जलालखेडा पोलिस करीत आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अंकुश माने यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली. पशुधन चोरीच्या घटनेचा जलद तपास करून टोळीला जेरबंद केल्याने रोहणा परिसरातील पशुपालकांनी पोलिसांच्या कारवाईचे स्वागत केले आहे.

**थोडक्यात**

## महानिर्मितीच्या संचालक (इंधन) पदी विजय राठोड यांची नियुक्ती

### भुसावळ, कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर येथील कामगिरीनंतर राज्यस्तरीय जबाबदारी

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

महानिर्मितीच्या सेवेतून नुकतेच सेवानिवृत्त झालेल्या वरिष्ठ अधिकारी विजय राठोड यांची महानिर्मितीच्या संचालक (इंधन) पदावर



नियुक्ती करण्यात आली आहे. औष्णिक वीज निर्मिती क्षेत्रातील दीर्घ अनुभव, विविध प्रकल्पांमधील तांत्रिक नेतृत्व आणि उत्पादनक्षमतेत केलेल्या सुधारणा या पार्श्वभूमीवर त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राठोड यांनी आपल्या सेवाकाळात भुसावळ, कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर या राज्यातील महत्त्वाच्या औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये विविध पदांवर काम केले. प्रत्येक प्रकल्पात यंत्रणांची कार्यक्षमता वाढविणे, नियोजित देखभाल-दुरुस्ती, इंधन नियोजन आणि उत्पादन व्यवस्थापनावर त्यांनी विशेष भर दिला.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर केंद्राचा भारांक सुमारे ६५ ते ७० टक्क्यांवरून ९१.७५ टक्क्यांपर्यंत पोहोचला. १३४० मेगावॅट क्षमतेच्या केंद्रातून १२२९ मेगावॅट आणि त्यानंतर ११५९ मेगावॅट इतकी वीजनिर्मिती नोंदविण्यात आली. जुन्या संचांची कार्यक्षमता वाढविणे आणि नियोजित देखभाल व्यवस्थेचा परिणाम या कामगिरीत दिसून आला. त्यानंतर राज्यातील सर्वात मोठ्या औष्णिक वीज प्रकल्पांपैकी एक असलेल्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली. सुमारे २९२० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पात जुन्या संचांमधून २७३९ मेगावॅट वीजनिर्मितीची नोंद झाली. उत्पादन क्षमता वाढ, देखभाल नियोजन आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर या बाबी या कामगिरीत महत्त्वाच्या ठरल्या. नुकत्याच झालेल्या सेवानिवृत्तीनंतर आता त्यांची महानिर्मितीच्या संचालक (इंधन) पदावर नियुक्ती झाली आहे. या पदावर राज्यातील औष्णिक वीज प्रकल्पांसाठी इंधन उपलब्धता, पुरवठा साखळीचे नियोजन, कोळसा व्यवस्थापन आणि उत्पादनाशी संबंधित धोरणात्मक निर्णयांमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. राज्यातील औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये केलेल्या कामाच्या अनुभवाच्या आधारे त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आल्याने, महानिर्मितीच्या इंधन व्यवस्थापन आणि उत्पादन नियोजनाला त्याचा उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## खसाळा येथे महाआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद, १,९६३ रुग्णांनी घेतला लाभ



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

कामठी तालुक्यातील खसाळा येथे श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान व जिल्हा खनिज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या निःशुल्क महाआरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महसूल मंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून आयोजित या शिबिरात एकूण १,९६३ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरात ६६० लाभार्थींना मोफत चष्म्यांचे वितरण, १३४ नागरिकांची आयुष्मान भारत कार्डे तयार, तर २१० रुग्णांची विविध शस्त्रक्रियांसाठी नोंदणी करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते म्हणाले, "आरोग्य सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाला वेळेत आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, या उद्देशाने या महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गोरगरीब नागरिकांची आरोग्य तपासणी व आवश्यक उपचार त्यांच्या गावाजवळच उपलब्ध करून देणे, हाच या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे."

या शिबिरात इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, शालिनीताई मेघे हॉस्पिटल, आशा हॉस्पिटल (कामठी), स्वामी विवेकानंद हॉस्पिटल, शासकीय दंत महाविद्यालय, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, गुमथी येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध आजारांची तपासणी करून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन व उपचार दिले.

यावेळी कोराडी जगदंबा संस्थान मंदिर समितीचे विश्वस्त महावीर बिरखेडे, सरपंच जयश्री इंगोले, ब्रम्हा काळे, मोहन माकडे, उमेश रडके, प्रांजल वाघ, संकेत बावनकुळे, डॉ. रवी चव्हाण, डॉ. सागर पांडे, डॉ. सौरभ अग्रवाल, डॉ. प्रियंका बावनकुळे, डॉ. अभय तोडके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेकडो नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी, औषधोपचार, चष्मे, आयुष्मान भारत योजनेचा लाभ आणि शस्त्रक्रियांसाठी नोंदणीची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाली. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांप्रती समाधान व्यक्त केले.

## नागपूर जल ग्राहक सेवा ॲप अपग्रेडेशनसाठी ८ ते १० ऑगस्टला सेवा तात्पुरती खंडीत राहील

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

NMC-OCW द्वारे सर्व ग्राहकांना सूचित करण्यात येते की, 'नागपूर जल ग्राहक सेवा' या मोबाइल ॲप्लिकेशनमध्ये आवश्यक सॉफ्टवेअर अपग्रेडेशनचे काम केले जाणार आहे. हे काम ८ ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्री १२:०० वाजल्यापासून ते १० ऑगस्ट २०२६ रोजी मध्यरात्री १२:०० वाजेपर्यंत चालणार आहे. या कालावधीत 'नागपूर जल ग्राहक सेवा' ॲप तात्पुरते अकार्यरत राहील.

**पेमेंटचे पर्यायी मार्ग** – ऑनलाइन पेमेंटचे इतर सर्व पर्याय पूर्णपणे कार्यरत राहतील. पाणी बिलांचा भरणा कोणत्याही व्यत्ययाशिवाय करण्यासाठी ग्राहकांनी https://nagpurjalseva.ocwindia.com या अधिकृत वेब पोर्टलचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे. या कालावधीत सहकार्य आणि संयम राखण्याचे आवाहन NMC-OCW कडून ग्राहकांना करण्यात येत आहे. आमच्या डिजिटल सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आणि ग्राहकांना उत्तम अनुभव देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

# दिव्यांगाच्या साहित्य वाटप शिबीराच्या लाभार्थी नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींना नि:शुल्क साहित्य वाटप सोमवार १० रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिव्यांग, अंध, कर्णबधीरांना जयपूर फूटसह आवश्यक सहायक साहित्य देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व मनपाच्या सहकार्याने आज (ता.७) कविवर्य सुरेश भट सभागृह परिसरात लाभार्थीच्या नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराचा समारोप सोमवार १० रोजी सकाळी ९ वाजता कविवर्य सुरेश भट सभागृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निता ठाकरे उपस्थित राहतील.



नागपूर महानगरपालिका, भगवान महावीर विकलांग सहायता समिती, नागपूर जिल्हा परिषद, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व टाटा ट्रस्टने संयुक्तपणे हे शिबीर आयोजित केले आहे. जयपूर फूट तयार करण्याच्या मशीनचे पूजन अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम. यांनी केले. यावेळी भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे नारायण व्यास, समन्वयक सुबोध भंडारी उपस्थित होते. या शिबीरातील व्यवस्थेची पाहणी मुख्यमंत्री सचिवालय येथील सहसचिव आशा पठाण यांनी केली. यावेळी समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उपायुक्त निर्भय जैन, उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, माहिती व तंत्रज्ञान अधिकारी स्वप्निल लोखंडे, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, क्रीडा अधिकारी डॉ. पियूष अंबुलकर व अभिजीत राऊत उपस्थित होते. मनपाद्वारे शिबिरात येणाऱ्या दिव्यांग बांधवाना उत्तम सोयीसुविधा प्रदान केल्या जात आहेत. यावेळी एनसीसी, व एनएसएसचे स्वयंसेवक नागरिकांना सहकार्य करीत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ७ ऑगस्ट ते १० ऑगस्ट या काळात जयपूर फूट साहित्य, सहायक साधने मोजमाप व वाटप शिबीर कविवर्य सुरेश भट कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित केले आहे. शहरातील विविध भागातून आज सकाळपासून दिव्यांग व्यक्तींनी शिबीर स्थळी दाखल होऊन नोंदणी करण्यास सुरूवात केली. या शिबीरात दिव्यांगांना जयफूट फूट, व्हील चेअर, वॉकर, अपंगांना कॅलिपर, कुबड्या, कृत्रिम पाय, ट्रायसायकल, अंध व्यक्तींना ब्लाईंट स्टिक, कर्णबधिरांना श्रवण यंत्रांचे वाटप केले जाणार आहे. या सर्व लाभार्थींची नोंदणी सुरूवात करण्यात आली. विविध स्टॉल उभारण्यात आले आहे. या स्टॉलवर नोंदणी केली जात आहे. प्रत्येक प्रवर्गाच्या दिव्यांगासाठी वेगवेगळे नोंदणी स्टॉल उभारण्यात आले आहे. त्यानंतर मोजमाप व वैद्यकीय तपासणी करण्यात येत होती. लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मनपाचे कर्मचारी व एनसीसीचे कॅडेट मदत करीत होते. नागपूर मनपाच्या समाज विकास विभागातर्फे लाभार्थींना दूरध्वनीद्वारे कळविण्यात आले आहे. त्या प्रत्येक लाभार्थींची संबंधित स्टॉलवर नोंदणी केली.

**जयपूर फूटचे वितरण**

या शिबीरातून शहरातील दिव्यांगांना निःशुल्क जयपूर फूट मिळणार असल्याची माहिती भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे समन्वयक सुबोध भंडारी यांनी यावेळी दिली. गेल्या ५० वर्षांपासून जयपूरचे वाटप केले जात असून मनपाचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर शहरातील ३ हजारांवर दिव्यांगांना जयपूर देण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. या शिबीराचा फायदा शहरातील दिव्यांगांना होणार असल्याची माहिती भंडारी यांनी दिली.

**जयपूर फूटसाठी मोजमाप**

या शिबीरात जयपूर फूटसाठी विविध स्टॉल लावण्यात आले होते. नोंदणीनंतर दिव्यांगांचे जयपूर फूटसाठी मोजमाप व तपासणी करण्यात येईल. दिव्यांग व्यक्तींची तपासणी व मोजमापानंतर त्यांच्या मापाचे जयपूर फूट शिबीर स्थळी तयार करण्यात येत आहे. यामुळे लाभार्थ्यांना तात्काळ जयपूर फूट मिळत आहे.

**लाभार्थ्यांकडून उपक्रमाचे कौतुक**

यावेळी लाभार्थींनी या उपक्रमाबद्दल आभार व्यक्त केले. जयताळा भागातील कु. विद्या शरणागत दोन्ही पायांनी अधू आहे. या शिबीरात तिने नोंदणी केल्यानंतर म्हणाले, हा उपक्रम खूपच चांगला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मनपाने यासाठी घेतलेला पुढाकार स्तुत्य असल्याने कु. शरणागत हिने सांगितले.

राहुल कैथवास या तरुणाने व्हील चेअरसाठी नोंदणी केली आहे. या उपक्रमामुळे व्हील चेअर मिळणार आहे. यामुळे माज्यासाठी खूपच फायदेशीर ठरणार आहे. यामुळे शहरातील दिव्यांगांना सुद्धा फायदा होणार असल्याचे राहुल कैथवास यांनी सांगितले. तुकडोजी पुतळा परिसरातील रहिवाशी असलेला देवेंद्र खडतकर यांनी या शिबीरात नोंदणी केली आहे. या शिबीरातून देवेंद्रला व्हील चेअर मिळणार आहे. मनपाचा हा उपक्रम चांगला असून शहरातील विविध दिव्यांगांना या शिबीरामुळे जीवन जगणे सुसह्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**आवश्यक कागदपत्रे**

या शिबीरात नोंदणी करण्यासाठी दिव्यांगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, २ रंगीत पासपोर्ट छायाचित्रे आवश्यक आहे.

## अग्निशमन यंत्रणा न लावणाऱ्या इमारतींवर कारवाई करावी

### अग्निशमन व आपात्कालिन सेवा समितीच्या सभापती रुपाली ठाकूर यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** शहरातील उंच इमारती, शाळा व हॉस्पीटल व्यवस्थापनाला अग्निशमन यंत्रणा लावण्याची सक्ती करावी, या यंत्रणेची पूर्तता न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, असे निर्देश अग्निशमन व आपात्कालिन सेवा विशेष समितीच्या सभापती रुपाली ठाकूर



यांनी दिले. अग्निशमन व आपत्कालीन सेवा विशेष समितीची बैठक आज (ता.७) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात पार पडली. अध्यक्षस्थानी सभापती रुपाली ठाकूर होत्या. यावेळी समितीचे उपसभापती लखन येरावार, नगरसेवक बाबाराव तायडे, नगरसेवक सिराज अहमद अंसारी, नगरसेवक तुषार लारोकर, नगरसेविका प्रगती यादव, नगरसेविका सायमा नाज फैयाज कुरेशी यांच्यासह मुख्य अग्निशमन अधिकारी राजेंद्र उचके, तुषार बारहाते व शहरातील अग्निशमन केंद्राचे प्रमुख उपस्थित होते. शहरात १२०० इमारतींच्या मालकांनी अग्निशमन यंत्रणाचे नियमांचे उल्लंघन केले आहे तर शहरातील १४०० इमारतींच्या मालकांनी अग्निशमन सेवा विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नसल्याचे यावेळी सांगण्यात आले. या सर्व इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा सक्तीने लावण्यासाठी नोटीस तसेच विभागातर्फे पाठपुरावा, असे निर्देश रुपाली ठाकूर यांनी दिले.

## मुंढेंच्या वक्तव्याने सावजी पुन्हा चर्चेत; पण 'उमरेडची सावजी' हीच विदर्भाच्या अस्सल चवीची खरी ओळख!

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड-सतिश तुळसकर**

नागपूरचे माजी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या सावजी चिकन-मटण संदभार्तील वक्तव्यानंतर नागपूरातील सावजी भोजनालय चालक आणि हलबा (कोष्टी) समाज आक्रमक झाला आहे. सावजीची परंपरा, इतिहास आणि अस्सल ओळख यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या चर्चेत एक महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित राहतो. तो म्हणजे सावजी खाद्यसंस्कृतीचा उमरेडशी असलेला अतूट संबंध. नागपूर जिल्ह्यातील उमरेड हे आज सावजी चिकन, सावजी मटण आणि पारंपरिक विदर्भीय खाद्यसंस्कृतीचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळखले जाते. एकट्या उमरेड शहरातच शंभरच्या घरात सावजी भोजनालये असून, प्रत्येक भोजनालयाची चव, मसाला आणि भाजी बनविण्याची पद्धत वेगळी आहे. इथले बहुतांश सावजी व्यावसायिक स्वतःचे मसाले तयार करतात आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या खास पद्धतीने झणझणीत, सुगंधी आणि अस्सल चवीची भाजी बनवतात. हीच उमरेडच्या सावजीची खरी ओळख आहे.

हिवाळी अधिवेशनासाठी नागपुरात येणारे अनेक मंत्री, आमदार, अधिकारी आणि राजकीय नेते उमरेडच्या सावजीचा आस्वाद घेण्यासाठी आवर्जून येतात. निवडणूक प्रचारासाठी विदर्भ दौऱ्यावर येणाऱ्या अनेक नेत्यांच्याही खाद्ययादीत उमरेडची सावजी कायम अग्रस्थानी असते. इतकेच नव्हे, तर लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उमरेडमध्ये प्रसिद्ध असलेल्या पारंपरिक 'पाटवडी'चा आस्वाद घेतला होता. नॉनव्हेजसोबतच उमरेडची पाटवडीही राज्यभर प्रसिद्ध असून, अनेक खाद्यप्रेमी तिची विशेष मागणी करतात. उमरेड-पवनी-काऱ्हांडला वन्यजीव अभयारण्यात सफारीसाठी येणारे सेलिब्रिटी, पर्यटक आणि वन्यजीवप्रेमी देखील सफारीनंतर उमरेडच्या सावजीचा आस्वाद घेणे पसंत करतात. त्यामुळे पर्यटन आणि सावजी खाद्यसंस्कृती यांचेही एक वेगळे नाते निर्माण झाले आहे. सावजी परंपरेशी जोडल्या गेलेल्या हलबा (कोष्टी) समाजाचा इतिहासही तितकाच समृद्ध आहे. पूर्वी या समाजातील अनेक कुटुंबे हातमागावर देशी वस्त्रनिर्मिती करत होती. काळाच्या ओघात अनेकांनी पारंपरिक व्यवसायासोबत सावजी भोजनालयांचा व्यवसाय स्वीकारला आणि आपल्या मेहनतीने या चवीला राज्यभर वेगळी ओळख मिळवून दिली.

## उच्च न्यायालयाचा दणका; मांगरूळच्या सरपंचांना पुन्हा खुर्ची!

**प्रशासनाला तात्काळ कार्यभार परत देण्याचे आदेश**

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

मांगरूळ ग्रामपंचायतीच्या सरपंच मंजुषा जिभकाटे यांना अपात्र ठरविण्याच्या निर्णयाला मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती देत प्रशासनालाच मोठा झटका दिला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना सरपंचपदाचा कार्यभार तातडीने परत देण्याचे स्पष्ट निर्देश दिले असून, सात दिवसांत अनुपालन अहवाल सादर करण्याचेही आदेश दिले आहेत.



मंजुषा जिभकाटे यांनी मा. अपर जिल्हाधिकारी तसेच मा. अपर आयुक्त, नागपूर विभाग यांनी दिलेल्या अपात्रतेच्या आदेशाला आव्हान देत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका (क्रमांक ५२७३/२०२६) दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने ३० जुलै २०२६ रोजी दोन्ही अपात्रतेच्या आदेशांवर अंतिम निर्णय होईपर्यंत अंतरिम स्थगिती देत त्यांची अंमलबजावणी थांबविण्याचे निर्देश दिले.

उच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर पंचायत समिती प्रशासनालाही पावले मागे घ्यावी लागली. गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या आदेशाची तात्काळ आणि तंतोतंत अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत जिभकाटे यांना सरपंचपदाचा कार्यभार परत देण्यास सांगितले आहे. तसेच या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल सात दिवसांच्या आत पंचायत समितीकडे सादर करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९(१) अंतर्गत देण्यात आलेल्या अपात्रतेच्या आदेशालाही उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिल्याने मांगरूळ ग्रामपंचायतीतील राजकीय आणि प्रशासकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे. अंतिम निकाल येईपर्यंत न्यायालयाचा अंतरिम आदेश लागू राहणार असल्याने या प्रकरणाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## आमगाव नगरपरिषद प्रकरणावरून आमदार संजय पुराम यांच्यावर टीका; काँग्रेस व नागरिकांचे ९ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचे आंदोलन

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजू फुंडे**

आमगाव नगरपरिषद प्रकरण गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप करीत काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक संघटना तसेच आठ गावांतील नागरिकांनी ९ ऑगस्ट २०२६ पासून आमगाव तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. नगरपरिषद प्रकरणाचा तातडीने निकाल लावून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ मध्ये आमगाव नगरपरिषदेची घोषणा केली होती आणि त्यानंतर निवडणूक प्रक्रियाही पार पडली. मात्र हे प्रकरण नागपूर उच्च न्यायालयात गेले आणि राज्यपालांनी जारी केलेला अध्यादेश उच्च न्यायालयाने रद्द केल्याचे सांगितले जाते. त्यानंतर राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. आंदोलनकर्त्यांचा दावा आहे की, सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतर शासनाकडून विशेष पाठपुरावा झाला नाही.

पुढे विधानसभा निवडणुकीपूर्वी सप्टेंबर २०२५ मध्ये शासनाने ती याचिका मागे घेतली आणि तेव्हापासून हे प्रकरण शासनाकडे प्रलंबित असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आंदोलनकर्त्यांनी आमदार संजय पुराम यांच्यावरही टीका केली आहे. नगरपरिषद अथवा संबंधित गावांच्या प्रश्नांबाबत आश्वासने देण्यात आली; मात्र अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढल्याचा दावा करण्यात आला. या प्रकरणात आमदार अपेक्षित पाठपुरावा करण्यात अपयशी ठरल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, आमगावसह पदमपूर, कुंभारटोली, बिरसी, रिसामा, किडंगीपार, बनगाव आणि माल्ही या गावांतील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. तसेच वीज, पाणी, रस्ते, शिक्षण व इतर मूलभूत सुविधांबाबतही अनेक समस्या कायम असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, नगरपरिषद निवडणुका घेण्याच्या मागणीसाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ७ ऑगस्ट २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आमदार संजय पुराम यांना घेराव घालत नगरपरिषद प्रकरण तातडीने निकाली काढण्याची मागणी केली. यावेळी आमदारांनी कोणतेही ठोस आश्वासन न देता तेथून निघून गेल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

आता ९ ऑगस्टपासून होणाऱ्या प्रस्तावित आमरण उपोषणाकडे संपूर्ण आमगाव परिसराचे लक्ष लागले असून, या आंदोलनावर शासनाची काय भूमिका राहते, याकडे नागरिकांचे लक्ष आहे.